




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. १९ नोव्हेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ००९ | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# बिबट्यांच्या नसबंदीला परवानगी

## बचाव केंद्रांची क्षमता वाढवा : एकनाथ शिंदे

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



बिबट्यांच्या नसबंदीची परवानगी केंद्राकडून मिळाली आहे. त्यामुळे दीर्घकालीन उपाययोजनेत नरभक्षक बिबट्यांना शोधून नसबंदी करावी,असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी बिबट्यांसदर्भात झालेल्या बैठकीत दिले. मंत्रालयात झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, मुख्य सचिव राजेश कुमार, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वैद-सिंगल, राज्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक एम. श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास रेड्डी, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आदी उपस्थित होते. बिबट्यांचा समावेश शेड्यल एकमध्ये असल्याने नरभक्षक बिबट्यांना पकडणे, त्यांना मारणे यावर मर्यादा येतात. त्यामुळे बिबट्यांना शेड्यल एकमधून काढण्यासंबंधी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. पिंजरे, वाहने, मनुष्यबळ आदी बिबटे पकडण्यासाठी आवश्यक साहित्यासाठी जिल्हा नियोजन समितीतून निधी उपलब्ध करून द्यावा, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

बिबट्यांची समस्या वाढल्यामुळे लोकांमध्ये रोष निर्माण झाला असून, तातडीने उपाययोजना करण्यासाठी गाव व शहराजवळ फिरणाऱ्या बिबट्यांना ड्रोनच्या साहाय्याने शोधून त्यांना पकडण्यात यावे. नागरी वस्तीत बिबटे आल्यास नरभक्षक समजूनच त्यांना पकडण्यात यावे अशा सूचना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या.

## चोरीला गेलेले १०१ मोबाईल सिडको पोलिसांनी मिळवून दिले परत




छत्रपती संभाजीनगर : सिडको पोलिस ठाण्याच्या हद्दीतून गेल्या दहा महिन्यांत चोरीला गेलेले, हरवलेले, रिक्षा, बसमध्ये विसरून राहिलेले नागरिकांचे १०१ मोबाईल पोलिसांनी परत मिळवून दिले. मंगळवारी (दि.१७) डीसीपी प्रशांत स्वामी यांच्या हस्ते फिर्यादींना मोबाईल परत देताच त्यांचे चेहरे आनंदाने फुलून गेले होते. अधिक माहितीनुसार, सिडको हद्दीत विविध ठिकाणाहून नागरिकांचे मोबाईल हरवले, रिक्षा, बसमध्ये विसरून राहिले कोणाचे चोरी झाले अशा विविध तक्रारी गेल्या दहा महिन्यांत दाखल आहेत. मोबाईलचा शोध घेण्यासाठी पोलिस निरीक्षक अतुल येरमे यांनी अधिकारी, अंमलदारांना सूचना केल्या. सातत्याने मोबाईल सायबर पोलिसांच्या मदतीने ट्रेसिंगवर टाकण्यात आले. तांत्रिक तपास करून सायबर पोलिसांनी माहिती सिडको ठाण्यात दिली. त्यावरून पोलिसांनी मोबाईल वापरकरत्यांना संपर्क करून ते परत मागवून घेतले.




# ठाकरे गटाला मोठा धक्का; अद्वय हिरे भाजपात, संभाजी पवार राष्ट्रवादीत

## मालेगाव व येवल्यातील राजकीय समीकरणे बदलणार

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांतर जोरात सुरू आहे. जिल्ह्यात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे उपनेते व मंत्री दादा भुसे यांचे कट्टर विरोधक अद्वय हिरे यांनी भाजपात प्रवेश केला. येवल्याचे उबाठाचे नेते माजी आमदार मारोतराव पवार, संभाजी पवार यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. या दोन्ही प्रवेशाने जिल्ह्यात ठाकरे शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे.

मालेगावमधील हिरे व मंत्री भुसे यांच्यातील वाद सर्वश्रुत आहे. गत विधानसभा निवडणुकीत मंत्री भुसे व हिरे यांच्यात लढत झाली होती. त्यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी हिरेंना मोठी ताकद दिली होती. यात, मंत्री भुसे विजयी झाले होते. निवडणुकीनंतर मंत्री भुसे यांनी हिरे यांच्या शैक्षणिक संस्थांमधील गैरकारभार बाहेर काढण्यास सुरूवात केली. यानंतर हिरे घराण्यातील माजी आमदार तथा अद्वय हिरे यांचे बंधू अपूर्व हिरे यांनी भाजपात प्रवेश केला. त्यावेळी अद्वय हिरे यांचा प्रवेश झाला नव्हता. परंतु, अद्वय हिरे यांनी आता भाजपात प्रवेश केला. त्यामुळे त्यांच्या भाजप प्रवेशामुळे पुन्हा एकदा भुसे विरुद्ध हिरे हा राजकीय संघर्ष तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

येवला विधानसभेतचे प्रतिनिधीत्व केलेले ज्येष्ठ नेते मारोतराव पवार व त्यांचे पुतणे येवला पंचायत समितीचे माजी सभापती संभाजी पवार यांनी ठाकरे शिवसेनेला जय महाराष्ट्र केला. त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश केला. संभाजी पवार यांनी यापूर्वी मंत्री छगन भुजबळ यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती. गत निवडणुकीतही पवार यांनी भुजबळ यांना विरोध दर्शवत महाविकास आघाडीचे उमेदवारांमागे ताकद उभी केली होती. परंतु, आगामी निवड़णुकीत समीकरणे लक्षात घेत पवार यांनी मंत्री भुजबळ यांच्या माध्यमातून राष्ट्रवादीत प्रवेश केला. या प्रवेशाने येवल्यात राष्ट्रवादीला मोठे बळ मिळाले आहे.

# टिळक पुलावरील कोंडी फुटणार

## येलवे मार्ग थेट सेनापती बापट मार्गाला जोडणार

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



एलफिन्स्टन पूल बंद केल्याने दादरच्या टिळक उड्डाणपुलावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. या समस्येवर उपाय म्हणून महापालिका प्रशासनाने जी. उत्तर विभाग कार्यालयासमोरील येलवे मार्ग थेट सेनापती बापट मार्गाला जोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शिवाजी मंदिर आणि वीर कोतवाल उद्यान येथे होणारी वाहतूक कोंडी समस्या सुटणार आहे. दादर पश्चिम येथील एन. सी. केळकर मार्गाला जोडून जे. के. सावंत मार्ग जात आहे. हा मार्ग पुढे मनमाला टँक रोड रस्त्याला जोडला जावून यापुढे माटुंगा रोड पश्चिम येथील पुलाजवळ जोडला आहे. तसेच जे. के. सावंत मार्गावर जी. उत्तर विभागासमोरुन हरिश्चंद्र येलवे मार्ग जातो.

हा येलवे मार्ग पुढे जावून खंडित होत असून या रस्त्याचा पुढील मार्ग मोकळा केल्यास तो सेनापती बापट मार्गाला जावून मिळू शकतो. त्या दृष्टिकोनातून महापालिका प्रशासनाने निर्णय घेत जमीन संपादित करून येवले मार्ग सेनापती बापट मार्गाला जोडण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

रस्ता रुंदीकरणासाठीचा अडथळा दूर करून छत्रपती शिवाजी महाराज मंदिर नाट्यगृहासमोरील जे. के.सावंत मार्गाला जोडणारा हरिश्चंद्र येलवे मार्ग थेट सेनापती बापट मार्गाला जोडला जाणार आहे.

तर हरिश्चंद्र येलवे मार्ग हा जे. के. सावंत मार्गापासून सेनापती बापट मार्गाला जोडल्यास न.चि. केळकर मार्गावरील कोतवाल उद्यान व टिळक पुलावरील वाहतूक कोंडी कमी होणार असल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

हा रस्ता जे. के. सावंत मार्गाच्या ठिकाण 40 फूट रुंदीचा आणि पुढे 50 फूट रुंदीचा तर सेनापती बापट मार्गाला जोडण्याच्या ठिकाण 6.10 मीटर अर्थात 20 मीटर रुंदीचा असेल, अशी माहिती पालिका सूत्रांनी दिली. या रस्त्यासाठी सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्या असून आता जमीन हस्तांतरीत करण्यात येणार आहे.

# ८ महिन्यांच्या गर्भवती भारतीय महिलेचा मृत्यू

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे एका भीषण कार अपघातात गर्भवती भारतीय महिलेचा मृत्यू झाला. समनविता धारेश्वर (वय ३३) असे या महिलेचे नाव आहे. ती तिच्या पती आणि तीन वर्षांच्या मुलासह चालत जात असताना ही दुर्घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या आठवड्यात समन्विथा धारेश्वर पती आणि मुलासोबत हॉर्न्सबी येथील जॉर्ज स्ट्रीटवरून रात्री ८ वाजण्याच्या सुमारास पायी जात होत्या. यावेळी रस्ता ओलांडत असताना एका किया कार्निव्हल कारने त्यांना जाण्यासाठी वेग कमी केला. त्याचवेळी, मागून भरधाव वेगाने आलेल्या एका बीएमडब्ल्यू कारने किया कारला जोरदार धडक दिली. अपघाताचा धक्का इतका जबरदस्त होता की किया कार पार्कच्या प्रवेशद्वारातून थेट समन्विथा यांना धडकली. अपघातानंतर समन्विथा यांना तातडीने हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. पोलिसांनी बीएमडब्ल्यू चालवणारा १९ वर्षीय चालक आरोन पापाझोग्लू याला अटक केली आहे.

# नवाब मलिकांवर आरोप निश्चित

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



■ दाऊदसंबंधित मनी लॉंडरिंग

माजी मंत्री आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते नवाब मलिक यांना विशेष 'एमपीएमएलए' न्यायालयाने झटका दिला आहे. दाऊद इब्राहिमशी संबंधित मनी लॉंडरिंग प्रकरणात अखेर नवाब मलिक यांच्यासह अन्य आरोपींविरोधात मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत विशेष 'एमपीएमएलए' न्यायालयाचे विशेष न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी मंगळवारी आरोप निश्चित केले. मात्र, मलिक यांनी या आरोपांचा इन्कार केला. त्यामुळे या खटल्याची पुढील सुनावणी 19 डिसेंबरला होणार आहे.

नवाब मलिक यांनी दाऊद इब्राहिम कासकरच्या डी-कंपनीसोबत कट रचून अनेक भूखंड असलेल्या कुर्ल्यातील मालमत्ता लाटल्याचे आरोप भाजपने केले होते. यानंतर 'ईडी'ने मलिक यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून नंतर आरोपपत्र दाखल केले. दरम्यान, नवाब मलिक यांच्या कुटुंबीयांमार्फत चालवण्यात येणाऱ्या मेसर्स मलिक इन्फ्रास्ट्रक्चरने दोषमुक्तीसाठी अर्ज केला होता. तो विशेष न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी गेल्याच आठवड्यात फेटाळून लावत मंगळवारी (दि. 18) न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार मलिक यांच्यासह अन्य आरोपी न्यायालयात हजर होते. याप्रकरणी 'ईडी'ने नवाब मलिक यांना 2022 मध्ये अटक केली होती. त्यानंतर ऑगस्ट 2024 मध्ये वैद्यकीय कारणास्तव ते जामिनावर बाहेर आहेत. दाऊदची बहीण हसीना पारकर, सलीम पटेल, 1993 च्या मुंबई स्फोटाचा आरोपी सरदार खान व नवाब मलिक यांनी गोवावाला कंपाऊंडमधील मुनीरा प्लंबर या महिलेची तीन एकर जमीन कट रचून बळकावल्याचा आरोप आहे.

# छोटे भूखंड करणार विनाशुल्क नियमित; तीन कोटी नागरिकांना लाभ

**मुंबई: : (समर्थ गांवकरी)**



तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन करून झालेले जमीन व्यवहार आता निःशुल्क नियमित करण्यात येणार आहेत. ही माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी येथे दिली. बावनकुळे म्हणाले, या निर्णयाचा राज्यातील 60 लाख कुटुंबांसह सुमारे 3 कोटी नागरिकांना फायदा होणार आहे. विशेष म्हणजे, तुकडेबंदी कायद्याविरुद्ध व्यवहार हा सात-बारावरील शेरा काढून टाकला जाईल. आठ मुद्द्यांच्या या कार्यपद्धतीने महाराष्ट्रातील अनेक वर्षांपासून रखडलेला छोट्या जमिनीचा व्यवहार कायदेशीर होईल. महसूल विभागाने याबाबतची कार्यपद्धती जारी केली असून, 15 नोव्हेंबर 1965 ते 15 ऑक्टोबर 2024 या कालावधीत झालेल्या जमीन व्यवहारांना लागू असणार आहे. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, जमाबंदी आयुक्त, भूमी अभिलेख नोंदणी अधीक्षकांसह विभागीय आयुक्तांकडे यासंदर्भात कार्यपद्धतीसंदर्भातील पत्र पाठविण्यात आले आहे. 3 नोव्हेंबर रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यासारख्या नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्रातील निवासी-वाणिज्यिक झोन, छावणी क्षेत्रातील जमिनी, प्रादेशिक आराखड्यात अकृषिक वापरासाठी दर्शविलेले क्षेत्र आणि गावठाणांच्या हद्दीलगतचे 'पेरीफेरल एरिया' क्षेत्र यामध्ये समाविष्ट आहे.

# लवकरच झुकतील गर्विष्ठ माना

## अनगरच्या 'बाळाने' उडता तीर अंगावर घेतलाय, अजित पवारांना अद्वातद्वा बोलणाऱ्या राजन पाटलांच्या मुलाला सूरज चव्हाणांनी सुनावलं

**सोलापूर : (समर्थ गांवकरी)**



सोलापूर जिल्ह्यातील अनगर नगपंचायतीमध्ये उज्ज्वला थिटे यांचा उमेदवारी अर्ज बाद ठरल्यानंतर राजन पाटील यांचे सुपुत्र बाळराजे पाटील यांनी जोरदार आनंद साजरा केला होता. यावेळी बाळराजे पाटील यांनी अजित पवार यांना उद्देशून एक वक्तव्य केले होते. 'अजित पवार तुम्ही सगळ्यांचा नाद करा, पण अनगरकरांचा नाही', असे वाक्य बाळराजे पाटील यांनी बोट दाखवत म्हटले. त्यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला होता. या टीकेला राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रवक्ते सुरज चव्हाण यांनी पुन्हा आपल्या भाषेत प्रत्युत्तर दिले आहे.

सुरज चव्हाण यांनी त्यांच्या सोशल मिडीया एक्सवरती पोस्ट लिहून राजन पाटील यांचे सुपुत्र बाळराजे पाटील यांच्यावर हल्लाबोल करत म्हटलंय की, गल्लीच्या राजकारणात पण रडीचा डाव खेळून जिंकलो जिंकलो असा माज करणाऱ्या लिंबूटिंबू 'बाळा' ने अजितदादांवर बरळणे म्हणजे 'इतभर लाकूड अन हातभर ढलपी' असा प्रकार आहे. विजयाचा उन्माद करताना अनगरच्या "बाळानी" उड़ता तीर अंगावर घेतला आहे. लवकरच .... झुकतील गर्विष्ठ माना!!, असंही पुढे सुरज चव्हाण यांनी म्हटलं आहे.

राजन पाटील यांचे सुपुत्र बाळराजे पाटील यांच्या वक्तव्यावरती राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी देखील भाष्य केलं आहे. रोहित पवारांनी देखील त्यांच्या सोशल मिडीया एक्स अकाऊंटवरती पोस्ट करत म्हटलं की, "आदरणीय राजन पाटील साहेब, आपण जेष्ठ नेते आहात, आपला नेहमीच आदर आहे, परंतु काल आपल्या चिरंजीवांचा अजितदादांवर एकेरी भाषेत टीका करणारा व्हिडिओ बघून मात्र अत्यंत वाईट वाटले. आपण स्वतः एकत्रित राष्ट्रवादीत सत्तेत असताना सुद्धा कधी अशी भाषा विरोधकांविरोधात वापरली नाही."

"ज्या सत्तेच्या जीवावर अंगात मस्ती येते ती सत्ता येत जात असते हे आपल्या चिरंजीवांना कदाचित माहीत नसेल. मतचोरीच्या जीवावर भाजपचे उभे राहिलेले सत्तेचे इमले कधी कोसळतील सांगता येत नाही, त्यामुळे त्यांना म्हणावं थोडं दमाने घ्या. असो, भाजपच्या नादी लागल्यावर राजकीय संस्कृती आणि #महाराष्ट्र_धर्माचा विसर पडतोच! आपण त्यांना योग्य ती समज द्याल ही अपेक्षा..!".

# या अपघाताला जबाबदार कोण?



## संपादकीय

नवले पुलावरील दर अपघातानंतर उपाययोजनांची चर्चा होते, पण कृती का होत नाही ? एखाद्या तज्ज्ञ संस्थेची मदत का घेतली जात नाही ? आता हे कामही पुणेकरांनीच करावे की पुण्याचे लोकप्रतिनिधी व अधिकारी ही तसदी घेतील ?

पाऊस पडला की पुण्यातील भिडे पुलाची चर्चा सुरू होते. हा पूल नदीच्या पाण्यात बुडला, त्यावरील वाहतूक बंद झाली की पुण्यातील पावसावर एक प्रकारे शिक्कामोर्तब होते. जनसंघाचे नेते व प्रसिद्ध वकील असलेल्या बाबाराव भिडे यांच्या नावाने असलेला हा पूल संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर देशात प्रसिद्ध झाला आहे. भिडे पुलाचे नाव ऐकले की चेहऱ्यावर स्मिताची रेषा उमटते, त्याच्या बरोबर विरोधात पुण्यातील नवले पुलाचे नाव ऐकले की भीती वाटते; कारण या पुलावर जवळपास दररोज अपघात होतात, अनेकांना आपला जीव गमवावा लागतो, जखमी व्हावे लागते. वाहनांचे अतोनात नुकसान होते. गुरुवारी झालेल्या अशाच अपघातामध्ये व त्यानंतर लागलेल्या आगीमध्ये तब्बल आठ जणांना जीव गमवावा लागला. अपघात होतो. त्याच्या बातम्या होतात. मग पुढारी व अधिकारी तेथे पाहणी करण्यासाठी येतात. पुन्हा अपघात होणार नाही यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या जातात. वाहतूक पुन्हा एकदा सुरू होते आणि पुढचा अपघात घडतो. गेली काही वर्षे अपघातांचे हे सत्र सुरूच आहे. बरं हा पूल साधा नाही, तर तो मुंबई–बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गाचा एक भाग आहे. एके काळी शहराच्या बाहेर असलेला हा रस्ता आता पुण्याच्या हद्दीत आल्या सारखाच आहे. त्यामुळे त्यावरून मालवाहतूक करणाऱ्या अजस्र कंटेनरवाहकांपासून ते साध्या दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत सगळ्याचीच वाहतूक सुरू होते. अपघात आणि मृतांच्या बातम्या वर्तमानपत्रांच्या पानांमध्येच राहतात. सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने सुवर्ण चौकोन रस्त्याची योजना आखली होती. हा रस्ता आणि नवले पूल याच योजनेचा एक भाग आहे. तोपर्यंत पुण्यातून बेंगळुरूला जाणारा रस्ता कात्रजच्या घाटातून जायचा. या नव्या योजनेमध्ये हा घाट वगळून नवीन बोगदा तयार करण्यात आला. हा बोगदा मुख्य रस्त्याशी जोडण्यासाठी तेथे असलेल्या जांभूळवाडी तलावावर व शेजारच्या दरीवर मोठा पूल बांधण्यात आला. या पुलावरून शहरामध्ये प्रवेश केला की एक मोठा उतार लागतो. तो उतार संपतानाच नवले पूल सुरू होतो. या उतारावर वाढलेल्या वेगाचा अंदाज भल्याभल्यांना येत नाही.



छोट्या गाड्यांच्या वेगावर नियंत्रण मिळविणे तुलनेने सोपे जाते; पण महाप्रचंड कंटेनर नेणाऱ्या किंवा मोठ्या ट्रकच्या चालकांना वेगावर नियंत्रण मिळविणे अवघड होते. त्यातच या मुख्य रस्त्याच्या कडेला असलेल्या सेवा रस्त्यावरून मुख्य रस्त्यावर वाहने येतच असतात. ती वाहने चुकवून या पुलापर्यंत येतानाच वाहनचालकांची दमछाक होते. त्यात वेगावर नियंत्रण मिळविता आले नाही, तर अपघात होतोच. गुरूवारी झालेला अपघात असाच आहे. एका कंटेनरला आपला वेग आवरता आला नाही म्हणून तो समोरच्या कंटेनरला धडकला.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ४०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | | 4 | 3 | 7 | 8 | 5 |
| | 8 | | 1 | | | | | 3 |
| | | | | 5 | | 2 | | |
| 2 | 7 | 3 | | | 1 | | 6 | |
| | 9 | | | | | | 3 | |
| | 6 | | 4 | | | 9 | 2 | 1 |
| | | 9 | | 7 | | | | |
| 7 | | | | | 2 | | 9 | |
| 4 | 5 | 8 | 9 | 1 | | 3 | | |

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ३९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 8 | 2 | 3 | 7 | 5 | 6 | 9 | 1 |
| 1 | 5 | 7 | 9 | 6 | 4 | 3 | 2 | 8 |
| 3 | 9 | 6 | 1 | 8 | 2 | 4 | 7 | 5 |
| 9 | 1 | 8 | 7 | 2 | 3 | 5 | 4 | 6 |
| 7 | 2 | 5 | 6 | 4 | 1 | 8 | 3 | 9 |
| 6 | 3 | 4 | 8 | 5 | 9 | 2 | 1 | 7 |
| 2 | 4 | 1 | 5 | 9 | 8 | 7 | 6 | 3 |
| 8 | 7 | 3 | 2 | 1 | 6 | 9 | 5 | 4 |
| 5 | 6 | 9 | 4 | 3 | 7 | 1 | 8 | 2 |

उत्तर उद्याच्या अंकात

१९ नोव्हेंबर २०२५
बुधवार
विक्रम संवत्- २०८२
कार्तिक शके
संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम

अयन- दक्षिणायान
मास- कार्तिक
ऋतु- सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:चतुर्दशी ०९:४३:५४
नक्षत्र:स्वाती ०७:५९:०५

योग:सौभाग्य
०८:५९:५७
करण:शकुनि
०९:४३:५४
करण:चतुष्पाद
२३:००:३३

## उपदेशाचे डोस

### जीवनाचे चार आधार

सुसंस्कारितेचे चार आधार आहेत- समजुतदारपणा, प्रामाणिकपणा, जबाबदारपणा आणि शूरपणा. यांना आध्यात्मिक-आंतरिक वरिष्ठतेच्या दृष्टीत तेवढेच महत्वाचे मानले गेले पाहिजे जेवढे शरीरासाठी अन्न, पाणी, वस्त्र आणि निवारा अनिवार्य समजले जाते. समजुतदारपणाचा अर्थ असा की, दूरदर्शी विवेकशीलता अवलंबिणे. एरवी लोक तात्पुरत्या फायद्यालाच सर्वस्व मानतात. तो मिळविण्यासाठी चुकीचे पाउलही उचलतात. त्यामुळे भविष्य अंधकारमय बनते. गुन्हेगारी घटक याच मनोवृत्तीचे असतात.दूरदर्शिता, विवेकशीलता अनुभवी शेतकऱ्याच्या कामासारखे आहे. ज्यानुसार शेत नांगरणे, बीज पेरणे, खत पाणी देणे, देखभाल करण्यात सुरूवातीचे नुकसान आणि कष्ट सहन केले जातात. दूरदर्शिता सांगते की, याचे फळ काळानुसार मिळणार आहे. एका बीजाच्या दाण्याच्या बदल्यात अनेक पट दाणे मिळणार आहेत. संयम आणि सत्कार्य अशीच बुद्धिमत्ता आहे. पुण्य परमार्थात भविष्य उज्ज्वल बनविणारी शक्यता अंतर्भूत असते. संयमाचे फळ वैभव आणि पौरुषाच्या रूपात दृष्टिंगत होणार असते. दूर्बिणच्या आधारे दूरपर्यंतची वस्तु पाहिली जाऊ शकते आणि त्या माहिती आधारे अधिक बुद्धिमत्तापूर्ण निर्णय घेतला जाऊ शकतो. अध्यात्माच्या भाषेत यालाच तृतीय नेत्र खुलणे म्हणतात. त्या आधारे संकटापासून वाचणे आणि उज्ज्वल भविष्याची निर्मिती शक्य आहे. कथनी-करनी एक ठेवणे यास प्रामाणिकपणा म्हणतात. सहयोग व सद्भाव अर्जित करण्यासाठी प्रामाणिमपणा प्रमुख आधार आहे. याला आपल्या व्यवसायात स्वीकारून अनेक लोकांनी मोठे यश मिळविले आहे. मोठी जबाबदारी उपलब्ध करणे आणि ती पार पाडण्यात प्रामाणिकपणा यश देतो. सुसंस्कारितेचा तिसरा भाग आहे जबाबदारी. बेजबाबदार उत्तरदायित्वापासून निर्लज्जतापूर्वक इंकार करू शकतात. मात्र जबाबदार लोकांना आपले उत्तरदायित्व नियमबद्धपणे पार पाडता येते. जो आरोग्य सुरक्षित ठेवण्याचा जीवन संपदेचा श्रेष्ठतम सदुपयोग करण्याचा, लोक परलोक उत्कृष्ट बनविण्याची जबाबदारी पार पाडतो, तोच संतोष, यश आरोग्याचा लाभ प्राप्त करू शकतो. चौथा व अंतिम टप्पा आहे- शूरपणा. दैनिक जीवनात अनेकानेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यासाठी साहस आवश्यक आहे. अन्यथा गडबडीत योग्य उपाय सुचणार नाही.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८१० - डॉ. विल्यम शील यांनी क्लोरिन वायूचा शोध रॉयल सोसायटीच्या सभेत जाहीर केला.
- १८८३ - अब्राहम लिंकन यांचे गाजलेले भाषण द गोटिसबर्ग अँड्रेस या दिवशी दिले.

### राष्ट्रीय

- १९८२ - भारतीय शासकीय दूरचित्रवाणी दूरदर्शनच्या रंगीत प्रक्षेपणास सुरुवात.
- १९९४ - ऐश्वर्या राय हिला सनसीटी दक्षिण आफ्रिकामध्ये विश्वसुंदरी निवडण्यात आले.
- १९९७ - कल्पना चावला अंतराळ प्रवाससाठी रवाना झाली.
- १९९८ - भारताला आशिया खेळात ३२ वर्षानंतर सुवर्ण पदक मिळाला.
- २००६ - जमीनीवरून जमीनीवर मारा करणाऱ्या मध्यम पल्ल्याच्या पृथ्वी या भारतीय क्षेपणास्त्राची चांदीपूर येथील परीक्षण तळावरून यशस्वी चाचणी घेण्यात आली.


### जन्म

- १८७५ - देवदत्त रामकृष्ण भांडारकर, प्राचीन भारतीय इतिहासाचे अभ्यासक.
- १८९७ - स.आ. जोगळेकर, लेखक व कायदेपंडित.
- १९१७ - इंदिरा गांधी, भारतीय पंतप्रधान.
- १९७५ - सुश्मिता सेन, बॉलीवुड अभिनेत्री.

### निधन

- १८२८-फ्रांझ पीटर शूबर्ट, संगीतकार.
- १९७० - बाबूराव सणस, पुण्याचे पहिले महापौर.
- २००८ - सर बर्नार्ड फिल्डेन, आग्रा येथील ताजमहाल आणि काणार्कच्या सूर्य मंदिराचे संरक्षण सल्लागार. मोन्यूमेंट टू कंजर्वेसन म्हणून ओळखले जणारे.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ४०



**आडवे शब्द**

१. अत्यंत नीच, दुष्ट
४. मंत्रीमंडळ
७. बांगड्यांचा व्यवसाय करणारी एक जमात
१०. बायको
११. झकास, छान
१२. लाकूड कापण्याचे दातेरी हत्यार
१४. एकूण एक सर्व
१५. घटस्फोट
१६. प्रतिष्ठा, समाजातील वजन
१७. लोणी
२०. मिंधा
२२. लहान मुलगी, कुमारी
२३. धनी, स्वामी
२५. केळ्यांचा गुच्छ
२६. अग्रलेख
२८. नृत्यकलेचा देव
३०. बगळा
३२. जरचा जोडीदार
३३. देवाशी केलेला करार
३४. तालासुरात बांधलेले
३५. परमेश्वर
३७. वाणी
३९. मनाचा ओढा
४२. दुलई
४३. पत्त्यातील जोडपे
४४. मराठीत कोर्ट
४५. खून
४६. एक ज्वालाग्रही खनिज
४८. स्वयंप्रकाशी कीटक
४९. फुललेला, फुगीर
५१. जागणे, देवाच्या नावाने जागरण करणे
५२. वेल
५४. डोंगर
५६. दचकणे, घाबरणे
५८. मोठ्या मनाचा
५९. संधी, फुरसत
६०. असंख्य, पुष्कळ
६२. जन्म-मृत्यू
६४. जिवलग मित्र
६७. धमनी, रक्तवाहिनी
६८. रसाळ
६९. नमनीय
७२. कंटाळवाणी (बडबड)
७४. भात शिजतानाचा आवाज
७६. त्वरित, अचानक
७७. प्रत्येक दिवशी
७८. वाळवी, उणीव

**उभे शब्द**

१. फार मोठे
२. योग्य, उचित
३. दहावी रास
४. नवऱ्याची दुसरी पत्नी
५. मिग्रन
६. प्रजा
७. पूर्ण बदल
८. प्रामाणिक, सज्जन
९. रत्न
१०. विद्युल्लता
१३. दागदागिने
१५. पुष्कळ, अति
१६. पळून जाणे
१८. रंग
१९. थेट, सरळ
२१. जाणीव, लाज
२२. शिल्लक राहिलेली रक्कम
२३. मानलेली मुलगी
२४. महाभयंकर
२७. दार
२९. विजयाचा नामघोष
३०. बांधलेला
३१. पं.भीमसेन जोशी यांचे गुरु
३६. जमीन मोजण्याची पट्टी
३८. गवत
४०. नाश पावणे (वा.प्र.)
४१. वडीलांची बहीण
४३. कणखर, ओबडधोबड
४५. पोलीस शिपाई
४७. आजूबाजूला
५०. वळू
५३. धातूचा धागा
५४. एक केशरी गराचे फळ
५५. मुलायम
५६. चविष्ट
५७. मागील अंगणाचा दरवाजा
५८. पार्वतीचे एक नाव
६१. फुलपाखराची प्रथमावस्था
६२. लोकांचा कल
६३. सामुदायिक रडणे
६५. पदार्थातील अतिमीठाची चव
६६. चरण
७०. रूचिहीन
७१. संधी
७३. दगडवरील घाव, पाणी साठवण्याचे साधन
७५. सडक,मार्ग

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. ३९ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.मैफल ३.कसई ५.रामभरोसे ६अ.ताप ८.वनराज ९.बाग १०.कुसळ ११.नरक १३.मरातब १५.बातमीदार १७.सरबत १९.हतबल २१.सणवार २३.कोना २४.देह २५.चकमक २८.आवाज ३०.याचक ३१.धडक ३३.वग ३५.नाराज ३७.मदत ३८.माकड ३९.साम ४०.सतावणे ४१.करपाशी ४३.कसा ४६.गमला ४८.सडाफटिंग ४९.पलायन ५१.नग ५२.पत्ता कट ५३.तरबेज ५६.तरट ५८.सुमन ५९.मटका ६०.शनिवार ६२.साधना ६४.तरुणाई ६५.रकमपात ६६.राम ६७.सपना ६८.घर ७०.धस ७२.कारभार ७५.ठोंब्या ७६.गपकन ७७.फूस ७८.कुंतल ७९.तारा

उभे उत्तर : १.मैदान २.लवकर ३.करामत ४.साजरा ५.राग ६.भरात ६अ.तास ७.पळभर ९.बाबत १०.कुरण १२.रसना १४.तहहयात १५.बालक १६.दास १८.बाटवा २०.बचकभर २२.वाणवसा २३.महिना २६.मधमाशी २७.कडक २८.आजतगाजत २९.जमणे ३२.कडकडाट ३४.गमनागमन ३६.रास ४१.कलागत ४२.पाचपट ४४.साफ ४५.फापटपसारा ४७.मन ४८.सकटनिकट ५०.नरम ५४.बेट ५५.जकातनाका ५७.रसोईघर ५८.सुरपारंबी ६०.शर ६१.वाम ६३.धपधप ६७.सबब ६९.गोबरा ७१.सक ७३.रफू ७४.भास ७४अ.छत

# नगराध्यक्ष पदासाठी चौरंगी लढत होणार

**राजगुरुनगर : (समर्थ गांवकरी)**



राजगुरुनगर नगरपरिषदेच्या निवडणुकीत महायुतीत घटक पक्ष वेगवेगळे लढणार असल्याने नगराध्यक्ष पदासाठी या लढतीत महायुतीचे भाजपा,राष्ट्रवादी काँग्रेस,शिवसेना बरोबर महाआघाडीचे शिवसेना(उद्धव ठाकरे)गटाचा उमेदवार अशी चौरंगी लढत होणार असल्याचे चित्र जवळ जवळ स्पष्ट झाले आहे. राजगुरुनगर नगरपरिषदेच्या २१ नगरसेवकपदासाठी तब्बल १६५ अर्ज दाखल झाले आहेत, तर अध्यक्षपदासाठी ११ अर्ज दाखल झाले आहेत. राज्याच्या सत्तेत एकत्र असलेल्या भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेकडून स्थानिक पातळीवर एकमत न झाल्याने नगरध्यक्षपदासह सर्व जागांवर उमेदवार देण्यात आले आहेत. मात्र महायुतीचे घटकपक्ष एकमेकांविरुद लढत असले तरी निवडणुकीनंतर नगरपरिषदेत वर्चस्व महायुतीचेच राहणार आहे.सध्यातरी नगरपरिषद निवडणुकीत भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांच्यातच चुरशीचा सामना रंगणार आहे.

राजगुरुनगर नगरपरिषदेच्या निवडणुकीत अर्ज दाखल करण्याचा सोमवारी (दि. १७) अखेरचा दिवस होता. नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस(अजित पवार) भाजप, शिवसेना(शिंदे गट) आणि शिवसेना( उद्धव ठाकरे) या चार पक्षाचे अधिकृत उमेदवार व इतर दोन अपक्ष उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. आमदार दिलीप मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत किरण आहेर यांनी नगराध्यक्ष पदाचा उमेदवारी अर्ज भरला.

उत्तर पुणे जिल्ह्यातील निवडणूक प्रमुख,तथा आमदार महेश दादा लांडगे यांच्या उपस्थितीत शक्तिप्रदर्शन करीत भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक पदाचे उमेदवार

व नगराध्यक्ष पदासाठी शिवाजी मांदळे यांनी अर्ज दाखल केला तर उबाठा कडून माजी तालुका प्रमुख सुरेश चव्हाण यांच्या उपस्थितीत बापू थिगळे यांनी उमेदवारी अर्ज भरला यावेळी मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.




नायगाव : नायगाव तालुका व्हॉइस ऑफ मीडियाचे नायगाव तालुका अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार गंगाधर ढवळे यांना छत्रपती संभाजी नगर विभागातून पंढरपूर येथील व्हॉइस ऑफ मीडियाच्या शिखर अधिवेशनात उत्कृष्ट पदाधिकारी पुरस्कार राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे.

## थोडक्यात बातम्या...




### आदिवाशी समाज बांधवांनतर्फे रावेर येथे विनंम्र अभिवादन

रावेर (स. गांवकरी) : स्वतंत्र काळात अनेक छोट्या मोठ्या लढ्यांचे बंड झालेत अनेक क्रांती विरांची कर्म गाथा कायमरूपी पडद्याच्या आड आहेत . त्यांचे कार्य नामनोश झालेली आहेत. मात्र त्यातिलच एक महान सेनानी धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच नाव इतिहासाला घ्याव लागल, त्याच कारण ही तितकेच आहे त्यांनी ब्रिटीश राजवटीला हदरवुन सोडल होत . त्यामुळे आदिवासींनी त्यांना देवाच्या देव्हाऱ्यात बसवुन , धरती आबा भागवान हि पदवी दिली होती . म्हणून इतिहासाला काळ्या दगडावर त्यांची नोंद लिहावे लागली . आपल्या न्याय हक्कासाठी त्यावेळी सर्व आदिवाशांनी दिलेल्या बलीदानाची उतराई होण्यासाठी आपल्या देशाचे लाडके पंतप्रधान आदरणीय नरेंद्र भाई मोदी यांनी , या सर्व स्वतंत्र सेनानी यांच्या नावाने योजना आखुन , आदिवासींचे जिवनामान उंचविसाठी अनेक कल्याणकारी योजना आखुन त्या आदिवाशी पर्यंत पोहचवत आहेत. असे प्रतिपादन हरलाल भाऊ कोळी यांनी जयंती निमित्त झालेल्या कार्यक्रमात रावेर येथे केले.

### आंबेडकरी स्त्री संघटन' तर्फे संविधान महोत्सव-जागृती परिषदेचे आयोजन

आंबेडकरी स्त्री संघटन
जागर संविधान संस्कृतीचा - मैत्राभावनेचा

मुंबई (स. गांवकरी) : २६ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाले असून, त्यानिमित्ताने प्रत्येक नागरिकांमध्ये भारतीय संविधानाची जनजागृती व्हावी, त्या विषयी महत्व व संविधानाची मूल्ये कळावी. तसेच प्रबोधन व्हावे याकरिता आंबेडकरी स्त्री संघटन' आयोजित भारतीय संविधानाच्या पंच्याहत्तरीनिमित्त संविधान महोत्सव-जागृती परिषदेचे आयोजन २५ नोव्हेंबर २०२५ रोजी दादर ,आंबेडकर भवन, येथे सकाळी १० ते सायं. ६ पर्यंत करण्यात आले आहे. सदर संविधान महोत्सव-जागृती परिषदेचेच्या निमंत्रक आंबेडकरी स्त्री संघटन संस्थापक प्रा. आशालता कांबळे आहेत तर उद्घाटक सुप्रसिद्ध अभिनेता, कवी डॉ. मिलिंद शिंदे असून कार्यक्रमाच्या अध्यक्षा सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. प्रज्ञा दया पवार असणार आहेत. तर सदर कार्यक्रमाचे उद्घाटन सकाळी १० वाजता होणार असून, दुपारी १ ते २ वाजताच्या सुमारास संविधानमूल्याधिष्ठित सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. तर दुपारी ३ ते ४.३० वाजता टॉक शो होणार असून त्यात . सुनील खोब्रागडे, राही भिडे, चयनिका शाह, डॉ. कुंदा प्र. नि., हसीना खान यांचा सहभाग असणार आहे. दु. ४.३० ते सायं. समारोप, प्रमुख वक्ते म्हणून लेखक, वैदयकिय संशोधक, सामाजिक विचारवंत प्रा. डॉ. राम पुनियानी असणार आहेत. ६ पर्यंत परिषदेचा समारोप होणार आहे.

# शिक्षणाचा उपयोग भविष्याचा वेध घेण्यासाठी करा - सभापती प्रा राम शिंदे

- दि पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या अमृत महोत्सवाचे विविध मान्यवरांच्या हस्ते मोठ्या उत्साहात उद्घाटन

**(समर्थ गांवकरी)**




शिक्षणात अमुलाग्र बदल झाला आहे. त्याचा उपयोग भविष्याचा वेध घेण्यासाठी करावा, आपला इतिहास लोकांनी वाचावा असे काम करावे मी दि पिपल्स एज्युकेशन सोसायटीचा माजी विद्यार्थी आहे. संस्थेने आधुनिक तंत्रशिक्षण शाखा सुरू कराव्यात मी आपल्या पाठिशी खंबीरपणे उभा आहे असे मत विधानसभेचे सभापती प्रा राम शिंदे यांनी व्यक्त केले.

दि पिपल्स एज्युकेशन सोसायटी या संस्थेस 74 वर्षे पूर्ण होऊन अमृत महोत्सवी वर्ष साजरे करत आहे या कार्यक्रमाचे उद्घाटन विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. मिलिंद जोशी अध्यक्ष अ. भा. मराठी साहित्य महामंडळ व कार्याध्यक्ष म. सा. प. पुणे हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष उद्धवराव देशमुख होते. यावेळी सचिव अरूणशेठ चिंतामणी, उपाध्यक्ष दिलीप देशमुख, अ. ल. देशमुख, माजी सचिव शशिकांत देशमुख, राजेश मोरे, श्रीकांत होशिंग, अनंता खेत्रे, ज्ञानदेव मुरूमकर, किसनराव ढवळे,

याच बरोबर संस्थेचे आधारस्तंभ असलेले अनेक ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, माजी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रा राम शिंदे म्हणाले की, तरूण पिढी हुशार स्मार्ट आहे. त्यांच्या बुद्धीला चालना मिळेल असे शिक्षण मिळावे काळाबरोबर सर्वानी आपल्यात बदल करणे आवश्यक आहे. तरच तो स्पर्धेत टिकून राहतो तसेच विद्यार्थ्यांनी अभ्यास करताना आई वडिलांचे कष्ट आठवा असे आवाहन केले.

यावेळी बोलताना अ. भा. मराठी साहित्य महामंडळ अध्यक्ष व कार्याध्यक्ष म. सा. प. पुणे प्रा. मिलिंद जोशी म्हणाले की, ग्रामीण भागातील मुलेच आज यशाच्या शिखरावरती आहेत. कारण कष्ट करण्याची क्षमता ग्रामीण विद्यार्थ्यांमध्येच असते. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांनी न्युनगंड बाळगता कामा नये. आपले वेगळेपण सिद्ध करा पदवी सगळ्या कडेच असते.जीवनात सर्वच क्षेत्र महत्त्वाचे आहेत. विद्यार्थ्यांनी भविष्यात काय व्हायचे ठरवावे त्यानुसार अभ्यास करावा व ज्ञानाचे दार उघडण्याचे काम शिक्षकांनी करावे. स्वतः ला सतत अपडेट ठेवावे, शिक्षकांनी ज्ञानसत्तेचा दरारा निर्माण केला पाहिजे शिक्षक लाडका झाला पाहिजे तसेच विद्यार्थ्यांनी डिजिटल उपवास धरावा असे आवाहन मिलिंद जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शशिकांत देशमुख यांनी करताना सांगितले की, संस्थेत हजारो विद्यार्थी घडले, राम शिंदे संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत आपण लवकरच व्यावसायिक शिक्षणाच्या वेगवेगळ्या शाखा सुरू करत आहोत.

आपल्या मनोगतात माजी प्राचार्य होशिंग श्रीकांत यांनी संस्था परिचय करून देताना सांगितले की, १९५१ मध्ये नगर जिल्ह्यात फक्त नगर व संगमनेर येथेच इंग्रजी शिक्षण मिळत होते. त्या काळात स्वातंत्र्य सैनिक मधुकर देशमुख, मिश्रीलाल कोठारी, दामोदर देशमुख, लक्ष्मण देशमुख, लक्ष्मण भिडे, वसंत माधव देशमुख, स्वातंत्र्य सैनिक शेखलाल शेख हुसेन, आनंदराव काशीद, स्वातंत्र्य सैनिक जी. पी. देशपांडे, राजाभाऊ देशमुख, डॉ. बी. एम महाजन, त्रिंबक डोंगरे यांच्या विचारातून संस्थेची उभारणी केली आज सुमारे पाच हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

# १०० नागरीकांना घरकुलांच्या चावीचे वाटप



**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील सदन ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व चार गांव पाड्यात विस्तार असलेल्या कुंरूद गृप ग्रामपंचायत हद्दीतील घरकुलांचे बांधकाम पुर्ण करणाऱ्या नागरिकांना घरकुलांच्या चावीचे ऊत्साहात वाटप करण्यात आले. प्रधानमंत्री जन-मन, ग्रामीण केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत तालुक्यातील कुंरूद गृप ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कुरुंद, वाफाळे, दळेपाडा, वाहुली येथील १८० आदीवासी नागरीकांना शासनाकडून घरकुले मंजूर झाली असुन त्यापैकी १०० घरकुलांचे वेळेत बांधकाम पुर्ण करण्यात आले आहे. त्या घरकुल लाभार्थींचां गृहप्रवेश व चावी प्रदान करण्याचा कार्यक्रम मंगळवारी ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत घेण्यात आला. यावेळी उपस्थीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती विलास पाटील यांनी घरकुल योजनेची माहिती देऊन उपस्थीत लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर श्रीकांत गायकर यांनी देशाचे पंतप्रधान नरेन्द्र मोदी हे प्रत्येकाला घर हा दीलेले शब्द पाळत असुन त्यांनी घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यात थेट निधी देऊन विलंब आणी भ्रष्टाचाराला आळा घातल्याचे आपल्या भाषणात सांगितले.

# गणपत क्षीरसागर यांचा पुरस्काराने सन्मानित

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



महात्मा फुले विचार मंच महाराष्ट्र राज्य व जुन्नर तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व जातीय वधू वर परिचय राज्य स्तरीय मेळाव्याचे त्याबरोबर विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांचे पुरस्काराने गौरविण्याचे आयोजन रविवार दि:-१६ नोव्हेंबर रोजी कला सागर मंगल कार्यालय येथे करण्यात आले होते. या वधू वर परिचय मेळाव्याचे हे १४ वे वर्ष असून शेकडो तरुण तरुणींनी यामध्ये सहभाग घेतला होता. सदर कार्यक्रमांमध्ये विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ११ मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरवि ण्यात आले त्यामध्ये नाभिक समाजाचे लोकप्रिय कार्यकर्ते व मंचर शहराचे माजी उपसरपंच गणपतराव शिरसागर यांना उत्कृष्ट सामाजिक कार्याचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले त्यांच्या भावी समाजकार्या साठी आंबेगाव आणि जुन्नर तालुका सर्व नाभिक समाजातर्फे हार्दिक शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे याप्रसंगी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते दिनकर गोविंद बाप्ते यांना सामाजिक कार्याबद्दल पुरस्कार देण्यात आला.तसेच शरदचंद्र माळी,विनायक भागवत अशोक गांधी,रमेश खोल्लम,विजय चौधरी,डॉ.सदानंद राऊत,संजय नेवासकर,अब्दुल कुरेशी,अनुष्का दरेकर इत्यादींनाही पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमाप्रसंगी खासदार अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे,अनिल मेहेर,मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी,सुखदेव बनकर नारायणगाव चे सरपंच शुभदा वाव्हळ,उपसरपंच योगेश पाटे, वारूळवाडीचे सरपंच विनायक भुजबळ,नेताजी डोके, प्राचार्य मिलिंद कसबे,जुन्नर तालुका नाभिक संघटना अध्यक्ष अरुण क्षीरसागर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे डोके इत्यादी उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन अध्यक्ष सचिन वऱ्हाडी,उपाध्यक्ष संतोष भुजबळ,कार्याध्यक्ष आत्माराम संते,सचिव हेमंत कोल्हे इत्यादींनी केले होते.

# अवघ्या पाचशेच्या स्टॅम्पवर विकला साखर कारखाना

## शिखर बँकेच्या अधिकाऱ्यांचा जामीन फेटाळला



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील देवीभोयरे येथील पारनेर सहकारी साखर कारखान्याची अवघ्या पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपर विक्री केल्याचा प्रताप राज्य सहकारी बँकेच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केला आहे. या प्रकरणात पारनेर न्यायालयाच्या आदेशानंतर बँकेच्या दोन वरीष्ठ अधिकाऱ्यांसह क्रांती शुगर कंपनीच्या नऊ संचालकांच्या विरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या गुन्ह्याचा तपास चालु असून, गुन्हा दाखल झाल्यानंतर बँकेच्या अधिकाऱ्यांनी अटकपूर्व जामीना करीता अहमदनगर सत्र न्यायालयाकडे अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता तो येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश महेश लोने यांनी फेटाळून लावला आहे .

याप्रकरणी अधिक माहिती अशी की , पारनेर सहकारी साखर कारखान्यावर साडेचौदा कोटींच्या एका बनावट गहाणखताने कर्जाचा फुगवठा दाखवून राज्य सहकारी बँकेने, पुणे येथील क्रांती शुगर प्रा. लि. कंपनीला या कारखान्याची मालमत्ता विक्री केली होती . त्यानंतर या प्रकरणी कारखाना बचाव समितीने पारनेर न्यायालयात धाव घेऊन दाद मागितल्यानंतर गुन्हा दाखल करण्याचे आदेश झाले होते. या गुन्ह्यातील आरोपींनी केवळ पाचशे रुपये मुद्रांक शुल्क भरून खरेदीखत नोंदणी केलेले आहे . बँकेच्या अधिकाऱ्यांनी साडेचौदा कोटीचे एक बनावट गहाणखत तयार करून कारखान्यावर कर्जाचा फुगवटा दाखवला आहे, कारखाना विक्रीच्या खरेदीखताला सुमारे विस कोटींचा बोजा लपवलेले सोळा बनावट सातबारा जोडले आहेत . पारनेर साखर कारखाना विक्रीची बेकायदा निविदा काढून एकाच कंपनीला फायदा होईल अशी संपूर्ण विक्रीची प्रक्रिया राबवली, विक्रीसाठी

आरोपींशी संगनमत करून त्यांच्या कडील कर चुकवलेला काळा पैसा चलनात आणला. पुढे आरोपींना त्याच मालमत्तेवर सुमारे तिनशे कोटींच्या कर्जाचा पुरवठा केला आहे . यापुर्वी आरोपींची रिव्हीजन याचिका सत्र न्यायालयाने फेटाळून लावली आहे. या गुन्ह्यात प्रमुख आरोपी असणारे राज्य सहकारी बँकेचे माजी सर व्यवस्थापक आणि नागपुर जिल्हा सहकारी बॅंकेचे विद्यमान प्रशासक अनंत भुईभार आणि कर्ज वितरण प्रमुख अनिल चव्हाण यांचा अटकपूर्व जामीन अहमदनगर सत्र न्यायालय नुकताच फेटाळला आहे. आरोपींनी केलेला गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा,आर्थिक अपहार, विश्वासघात, फसवणूक आणि बनावटगिरीशी निगडित असल्यामुळे या गुन्ह्याचे तपास कामी आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेण्याची आवश्यकता असल्याचा निष्कर्ष काढून त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात आला. आरोपींना पोलिसांनी तातडीने अटक करून पुढील तपासाचे आदेश दिले आहेत. पारनेर कारखाना कारखाना बचाव समितीच्या वतीने अँड. रामदास घावटे, अँड. सुदाम साठे,अँड. उन्मेश चौधरी, अँड. सोमनाथ गोपाळे यांनी बाजू मांडली.

### सुप्रिया सुळेंच्या कंपनीचा सहभाग

पारनेर साखर कारखाना विक्री घोटाळ्यातील क्रांती शुगर कंपनीचे चेअरमन ज्ञानेश नवले व ईतर संचालक हे राष्ट्रवादि कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचे निकटवर्तीय आहेत. क्रांती शुगर कंपणीला पारनेर साखर कारखाना विकत घेण्यासाठी पैसा पुरवठा करणारे पुणे येथील उद्योजक अतुल चोरडिया व अशोक चोरडीया यांच्याकडून सुमारे बावीस कोटी रुपये, तर अक्षर लॅण्ड डेव्हलोपर्स कंपनी कडुन नऊ कोटी रुपये रकमांचा पुरवठा करण्यात आल्याचे तपासात उघड झाले आहे, त्यापैकी अक्षर लॅण्ड डेव्हेलोपर्स कंपनीत सुप्रीया सुळे या भागीदार होत्या. तसेच या व्यवहारात पैसा पुरवणारे पुण्याचे चोरडीया बंधु आणि माजी खासदार विदुरा नवले हे शरद पवार व सुप्रीया सुळे यांचे अत्यंत जवळचे निकटवर्तीय आहेत त्यामुळे पोलिस तपासात राजकीय दबाव व हसक्षेप होत आहे. असे बचाव समितीचे अध्यक्ष रामदास घावटे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## संतुजी आनंदा धुमाळ ग्रा. बि. शेती सहकारी पतसंस्था मर्या, अकोले

### स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहीरनामा

ज्याअर्थी संतुजी आनंदा धुमाळ ग्रा. बि. शेती सह पतसंस्था मर्या, अकोले ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी खालील नमुद केलेल्या थकबाकी विरुध्द महा सह संस्था अधिनियम १९६० चे कायदा कलम १०१ अन्वये वसुली दाखले मिळाले असुन त्यांचे विरुध्द रितसर कर्ज मागणी नोटीस स्थावर मालमत्ता जप्ती नोटीस अपसेट प्राईज नोटीस बजावणी केली आहे. तरी खालील कर्जदारांविरुध्द अपडेट प्राईज मंजुरी नंतर त्यांची जप्त केलेली स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव क्र. १ दि. ११/७/२०२५ लिलाव क्र. २ दि. २२/७/२०२५ व लिलाव क्र. ३ दि. ३/८/२०२५ रोजी संस्थेच्या कार्यालयात ठेवण्यात आला होता. तरी सदर लिलावामध्ये कोणीही भाग घेतला नाही, म्हणून सदर मालमत्ता संस्थेच्या नावे वर्ग करणे बाबदचा प्रस्ताव मा. सहा. निबंधक सह संस्था अकोले दाखल केला आहे. सदर लिलावाबाबत काही हरकत असल्यास आठ दिवसांचे आत तक्रार करावी अन्यथा खालील थकबाकीदारांवर महा सह. संस्था अधिनियम १९६० चे कलम १०० व नियम ८५ (३) अन्वये कारवाई करण्यात येईल सदर मालमत्ता खालीलप्रमाणे..

| अ. न. | थकबाकीदारांचे नाव | गाव | वसुलीस दाखल रक्कम | स्थावर मिळकत | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गट नं. मिळकत नं. | क्षेत्र | आकार |
| १ | देविदास धोंडु देशमुख (कर्जदार) इस्माईल अहमद मणियार (जामीनदार) चाँद कासम शेख (जामीनदार) | राजुर | १९२०४ + होणारे व्याज+ सरचार्ज + होणारा खर्च | २०६ कर्ज दारांची | ०.३३ मिळकत | ०४१ |
| २ | संतोष काशिनाथ भडांगे (कर्जदार) सुरेखा राजेंद्र भडांगे (जामीनदार) नितीन परशराम मुतडक (जामीनदार) | राजुर | २३२१५ + होणारे व्याज+ सरचार्ज + होणारा खर्च | ५७/७ काशिनाथ | ३.२९ राघु भडांगे | ३.७५ यांचा हिस्सा |
| ३ | कैलास यशवंत घोडके (कर्जदार) अलका मच्छिंद्र खैरे (जामीनदार) प्रभाकर सिताराम फापाळे (जामीनदार) | उंच खडक खुर्द | १९५४० + होणारे व्याज+ सरचार्ज + होणारा खर्च | ३४/५ कैलास | ०.०४.५ यशवंत यांचा | ०.८० घोडके हिस्सा |
| ४ | बाळु वाळु परते (कर्जदार) अपर्णा संजय मैड (जामीनदार) दत्तात्रय जयराम जगदाळे (जामीनदार) | कोंहडी | ११०२३ + होणारे व्याज+ सरचार्ज + होणारा खर्च | ११०/१ कर्ज दारांची | ०.०३ मिळकत | ०.११ |

वरील मालमत्तेची चतुःसिमा नकाशाप्रमाणे आहे. सदर मालमत्तेची विक्री न झाल्यामुळे सदर मालमत्ता संस्थेच्या नावे वर्ग करणेचा प्रस्ताव सह. निबंधक सह. संस्था अकोले यांचेकडे सादर करत आहे. तरी सदर लिलावाबाबत हरकत असल्यास आठ दिवसात कळवावा.

दि. १८/११/२०२५

विशाल दि. बाणाईत
विशेष वसुली व विक्री अधिकारी
द्वारा संतुजी आनंदा धुमाळ ग्रा. बि. शेती सह पतसंस्था मर्या, अकोले

# संत दासगणू महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा साजरा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



संतकवी दासगणू महाराज हे साईबाबांचे आवडते शिष्य होते. त्यांनी कीर्तन, प्रवचन करून साईबाबांचा भक्तीचा महिमा वर्णन करून साईबाबांची महती सर्वांना सांगितली. साईबाबांनी दासगणू महाराजांना विठ्ठल रूपात दर्शन दिले होते. त्यामुळे दासगणू महाराजांनी "शिर्डी माझे पंढरपुर साईबाबा रमावर" या साई आरतीची रचना केली. दासगणू महाराजांनी छत्तीस वर्ष शिर्डी संस्थानचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले.साई स्तवन मंजिरी, गजानन विजय ग्रंथ,अशा अनेक ग्रंथांचे लेखन संत कवि दासगुण महाराजांनी केले होते. अकोळनेर या गावी संत दासगणु महाराजांच्या जन्म दाभोळकर वाड्यात झाला होता.संतकवी दासगणू महाराजांनी गावोगावी किर्तन व प्रवचन करून साईंची भक्ती व साईंचे कार्य व साईंची कीर्ती जगभर पोहोचवली.असे निरुपण हभप कु.राजश्रीताई कडलग यांनी केले आहे. अकोळनेर येथे संत दासगणू महाराज जन्मस्थळ परिसर विकास समिती व राष्ट्रहित संवर्धक मंडळाच्या वतीने दासगणू महाराजांची पुण्यतिथी सोहळा उत्साहात पार पडला.यावेळी विष्णुसहस्रनाम, सामुदायिक साई स्तवन मंजिरी पठण,साईबाबांची महाआरती करण्यात आली.तसेच हभप कु. राजश्रीताई कडलग यांनी संत दासगणू महाराज यांचे जीवन चरित्र सांगितले.श्रीमती रेखा मडावी व अतुल मडावी यांच्या हस्ते संत दासगणू महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात साई भक्तांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी संत दासगणू महाराज जन्मस्थळ परिसर विकास समितीचे अध्यक्ष सतीश झिकरे,महाराष्ट्र बँकेचे व्यवस्थापक शामसुंदरजी, उपाध्यक्ष श्रीमती शशिकला ताई बागडे,कोषाध्यक्ष सतीश गायकवाड,कार्यवाह सुनील गारुडकर,ह भ प राजेंद्र कडलग,नंदू गुजराती, विश्व हिंदू परिषदेचे गजेंद्र सोनवणे, रोहिदास सोनवणे आदी उपस्थित होते.





लोहा : नगरपालिका सार्वत्रिक निवडणुक- २०२५ च्या निवडणूक रिंगणात उतरण्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी नगराध्यक्ष पदासाठी एकूण ५ तर नगरसेवक पदासाठी एकुण १०६ उमेदवारी अर्ज दाखल झाले.लोहा नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी सोमवारी नामांकन दाखल करण्यायाच्या अखेरच्या दिवशी नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक विभागाकडे एकूण ५ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. त्यामध्ये भारतीय जनता पक्षाकडून गजानन सुभाषराव सूर्यवंशी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अ.प.) कडून शरद पाटील पवार, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कडून व्यंकटेश उर्फ सोनू संगेवार व अन्य दोन असे पाच उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले.तर एकुण १० प्रभातील २० नगरसेवक पदासाठी एकूण १०६ नामनिर्देशन पत्र दाखल झाले असल्याची माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली.

## थोडक्यात बातम्या...



### रावसाहेब वर्पे व भरत वाकचौरे यांचा दै. समर्थ गांवकरी कार्यालयात सत्कार!

अकोले (स. गांवकरी) : अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यकारी संचालक रावसाहेब वर्पे तसेच तालुका विकास अधिकारी भरत वाकचौरे यांनी आज दैनिक समर्थ गांवकरीच्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, दिवाळी अंक व घड्याळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दैनिक समर्थ गांवकरीच्या कार्याचा आढावा घेण्यात आला तसेच पुढील काळात समाजाभिमुख उपक्रम राबवण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन कार्यालयीन कार्यकारी व्यवस्थापकांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

### अल्पवयीन मुलीवर बलात्कार प्रकरणी ओतूर पोलिसात गुन्हा दाखल

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : ओतूर पोलिस ठाण्यात सात वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्या प्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.देवीदास रोहीदास गर्जे सध्या रा:-नेतवड ता:-जुन्नर जिल्हा पुणे, मुळ रा:- बडेवाडी, तालुका पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर असे आरोपीचे नाव असून त्याला ओतूर पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, सात वर्षीय अल्पवयीन मुलीवर देवीदास गर्जे यांनी रविवारी सायंकाळी बलात्कार केल्याची घटना उघडकीसआली ओतूर पोलिसांनी त्वरित तक्रार दाखल करून आरोपीला अटक केले.तसेच पिडित अल्पवयीन मुलीला पूणे येथील शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी कामी दाखल करण्यात आले आहे.नमूद गुन्ह्याचा पुढील तपास ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक लहु थाटे हे करीत आहेत.

### नगर तालुक्यात चौघांनी केली तरुणास मारहाण; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : साकत खुर्द (ता. अहिल्यानगर) शिवारातील कार्ले वस्ती येथे किरकोळ वादाच्या रागातून चौघांनी तरूणाला मारहाण केल्याची घटना घडली आहे. सुर्यकांत छबु पवार (वय ४०, रा. साकत खुर्द, कार्ले वस्ती) असे जखमी तरूणाचे नाव असून त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांनी दिलेल्या जबाबावरून अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशोक रंगनाथ वाघ, राजेंद्र रंगनाथ वाघ, विजय आसाराम वाघ आणि शाम राजेंद्र राजेंद्र वाघ (सर्व रा. साकत, कार्ले वस्ती) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. शनिवारी (१५ नोव्हेंबर) सकाळी ८.३० च्या सुमारास फिर्यादी चारचाकी वाहनातून आपल्या कामानिमित्त जात असताना कार्ले वस्ती तलावाजवळ संशयित आरोपींनी त्यांना अडवून त्याच्यावर हल्ला केला. एक दिवस आधी झालेल्या किरकोळ वादाचा राग मनात धरून अशोक वाघने कोयत्याने फिर्यादीच्या दंडावर व हातावर वार करून दुखापत केली. तर इतर संशयित आरोपींनी फिर्यादीस खाली पाडून लाथाबुक्यांनी मारहाण केली. मारहाणीच्या दरम्यान परत आमच्या वाटेला जाऊ नको, नाहीतर जीव घेऊ अशी धमकी दिल्याचे फिर्यादीने पोलिसांना सांगितले. तसेच फिर्यादीच्या चारचाकी वाहनाचे नुकसान केले आहे. जखमीवर खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. उपचार घेत असताना दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. पोलीस अंमलदार ए. डी. झावरे अधिक तपास करीत आहेत.

### मनोहर पाटील शिंदे यांची गाव गाठी भेटीत आघाडी तर जनतेचा प्रचंड प्रतिसाद

नांदेड (स. गांवकरी) : वाजेगाव सर्कल चे माजी जिप सदस्य मनोहर पाटील शिंदे हे सध्या नव्याने निर्मिती झालेल्या धनेगाव सर्कल मधून भाजपा पक्षा कडून इच्छुक उमेदवार असून ते सध्या सक्रिय पणे सर्कल मधील सर्व गावा मध्ये गाठी भेटी वर भर देत असून त्यांना मात्र अनेक गावात वाढता पाठींबा मिळत असल्याचे दिसून येत असून अनेक गावात त्यांना जनतेचा मोठ्या प्रमाणात कौल असल्याचे दिसून येत आहे. गेल्या वेळी ते वाजेगाव सर्कल मधून निवडून आले होते व त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक गावातील मुलभुत सुविधेचे विकास कामे चांगल्या प्रमाणे केले असल्या मुळे व मतदार संघातील गोर गरीबांची जनतेचे आडी आडचण सोडवण्या साठी धावून येणारे नेतृत्व म्हणून त्यांची परिचिती झाली आहे त्या मुळे गेल्या वेळेस केलेल्या कामाची पावती त्यांच्या कडे आहे त्यासाठी जनता जनार्दन माय बाप खंबीर असून जनता माझ्या साठी व मी सदैव जनतेच्या न्याय हक्कासाठी लढणारा शेतकरी मुलगा म्हणून ते परिचित आहेत.

# अहिल्यानगर शहरात शिवसेनेच्या मुलाखतींना इच्छुकांची गर्दी

- १७ प्रभागांत उमेदवारी चाचपणी घेऊन १७१ इच्छुकांच्या मुलाखती पूर्ण

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



महापालिका निवडणुकीच्या तयारीला वेग येत असताना शिवसेनेने उमेदवारीसाठी इच्छुक कार्यकर्त्यांच्या मुलाखती नुकतीच सोमवार (दि. १७ नोव्हेंबर) रोजी टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात घेतल्या.

या मुलाखतींसाठी शहरातील विविध प्रभागांमधून आलेल्या इच्छुकांसह शेकडो कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. १७ प्रभागांसाठी तब्बल १७१ इच्छुकांनी मुलाखती दिल्याने वातावरण निवडणूक उत्साहापूर्ण बनले होते.

मुलाखतींच्या प्रारंभी शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. त्यानंतर जिल्हा प्रमुख अनिल शिंदे, बाबूशेठ टायरवाले, शहर प्रमुख सचिन जाधव, राज्य प्रवक्ते संजीव भोर, संपर्क प्रमुख दिलीप सातपुते, संभाजी कदम, संजय शेंडगे, गणेश कवडे, बाळासाहेब बोराटे यांनी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

कार्यकर्त्यांच्या कामगिरी, प्रभागातील जनसंपर्क, स्थानिक प्रश्न, विकासाची दृष्टी, तसेच प्रभागातील त्यांच्या प्रभावाच्या आधारे चाचपणी करण्यात आली.

शहरातील वाढती राजकीय चढाओढ लक्षात घेता, प्रत्येक प्रभागात योग्य, सक्षम आणि जनतेच्या मनातील उमेदवाराची निवड करणे हे पक्षाचे उद्दिष्ट असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा प्रमुख अनिल शिंदे म्हणाले की, नगर शहर हा शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला आहे. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विकासकामांनी प्रभावित होऊन अनेक नवीन चेहरेही शिवसेनेच्या तिकीटावर निवडणूक लढवण्यास पुढे येत आहेत. वरिष्ठ पातळीवर नव्या आणि अनुभवी कार्यकर्त्यांचा योग्य मेळ साधून उमेदवारी निश्चित केली जाणार आहे. सर्व अर्ज वरिष्ठांकडे पाठविण्याची माहिती त्यांनी दिली.

शहर प्रमुख सचिन जाधव म्हणाले की, उमेदवार ठरवताना पक्षनिष्ठा, जनाधार, काम करण्याचा अनुभव आणि स्थानिक लोकप्रियता यांचा काटेकोर विचार केला जाईल. महायुतीबाबत निर्णय वरिष्ठ घेतील; पण शिवसेनेला योग्य जागा न मिळाल्यास पक्ष स्वबळाचा मार्ग स्वीकारणार असल्याचे ते म्हणाले.

# युवकावर चाकू हल्ला; कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शेकोटीसाठी शेतातील लाकडे चोरल्याच्या संशयावरून एका युवकावर चाकूने हल्ला केला. तसेच त्याच्या चुलत्याला मारहाण करण्यात आल्याची घटना गुरूवारी (१३ नोव्हेंबर) रात्री १० वाजेच्या सुमारास काटवन खंडोबा परिसरातील रस्त्यावर घडली. हल्ल्यात जखमी झालेल्या रोहीत रवी पंडीत (वय २१, रा. संजय नगर, काटवन खंडोबा) यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू असून त्यांनी दिलेल्या जबाबावरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.


संतोष अशोक जाधव, अतुल अशोक जाधव (दोघे रा. टिळक रस्ता, अहिल्यानगर) आणि त्यांच्या इतर तीन अनोळखी साथीदारांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी रोहीत पंडीत हे गुरूवारी रात्री काम संपवून मित्रासोबत घरी जात होते. काटवन खंडोबामागील रस्त्यावर शेकोटी पेटलेली दिसल्याने तेथे ते शेकण्यासाठी थांबले. त्यांचा मित्र तेथून निघून गेल्यानंतर, संतोष जाधव तेथे आला. माझ्या मालकीचे लाकूड का आणले? त्याची शेकोटी का करतो? असे म्हणत त्याने रोहीतला मारहाण केली.

# दोंडाईचा नगरपरिषदेत इतिहास रचला!

- भाजपच्या नयनकुवर ताई रावल बिनविरोध नगराध्यक्ष
- सातही नगरसेवकही बिनविरोध निवडून आले!

**दोंडाई : (समर्थ गांवकरी)**

दोंडाईचा – महाराष्ट्रातील सुरू असलेल्या जिल्हा परिषद व नगरपरिषद निवडणुकांमध्ये दोंडाईचा शहराने राज्याच्या इतिहासात अभूतपूर्व कामगिरी करत नवा विक्रम नोंदवला आहे. भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठ नेते, धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कॅबिनेट मंत्री मा. जयकुमार रावल यांच्या मातोश्री सौ. नयनकुवर ताई रावल यांची महाराष्ट्रातील पहिली बिनविरोध नगराध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या विजयानंतर संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून भाजपच्या विजयाची ही दणदणीत सुरुवात मानली जात आहे.



दोंडाईचा-वरवाडे नगरपरिषदेत यावेळी सातही नगरसेवक देखील बिनविरोध निवडून येत भाजपने जोरदार दमदार कामगिरी साधली आहे. विरोधकांचा उमेदवार न उभा राहिल्याने या सर्वच जागांवर सहज विजय मिळाला. शहरात भाजप कार्यकर्त्यांमध्ये आनंदोत्सवाचे वातावरण असून, नागरिकांनीही या ऐतिहासिक निवडीचे स्वागत केले आहे.

दोंडाईचा-वरवाडे नगरपरिषदेचे बिनविरोध निवड झालेले उमेदवार!

1. ब – सर्वसाधारण महिला
   सौ. रविना महेश कुकरेजा
2. अ – अनुसूचित जमाती महिला
   सौ. सरलाबाई छोटू सोनवणे
3. ब – सर्वसाधारण
   चतुर जिभाऊ पाटील
4. ब – सर्वसाधारण महिला
   सौ. राणी राकेश अग्रवाल
5. अ – इतर मागासवर्गीय महिला
   सौ. वैशाली प्रविण महाजन
6. ब – सर्वसाधारण
   निखिलकुमार रविंद्रसिंह जाधव
7. अ – अनुसूचित जमाती सर्वसाधारण
   भरतरी पुंडलिक ठाकुर

दोंडाईचा शहरात अशी बिनविरोध निवड होणे हा लोकविश्वासाचा मोठा विजय असल्याचे भाजप जिल्ह्यातून सांगितले जात आहे. नगराध्यक्ष म्हणून नयनकुवर ताई रावल यांचे नेतृत्व आणि नगरपरिषदेची नवी टीम शहर विकासासाठी सक्षम ठरेल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# १५०व्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सामाजिक शास्त्रे संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष व्याख्यानाचे आयोजन शनिवार १५ नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विज्ञान व तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील होते. प्रमुख वक्ते म्हणून आदिवासी साहित्य व संस्कृतीचे अभ्यासक डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांनी "आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास आणि भगवान बिरसा मुंडा" या विषयावर सखोल आणि प्रेरणादायी मार्गदर्शन केले. डॉ. अनमुलवाड यांनी आपल्या व्याख्यानात आदिवासी समाजाचे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील मोलाचे योगदान अधोरेखित केले. ब्रिटिश राजवटीला दिलेले भगवान बिरसा मुंडा यांचे कठोर आव्हान, तसेच त्यांच्या प्रेरणेने राणी दुर्गावती, तीलका मांझी, शंकर शहा–रघुनाथ शहा, सिद्धो–कान्हो, तंट्या भिल्ल, उमाजी नाईक, राघोजी भांगरे, बाबुराव शेडमाके यांसारख्या आदिवासी शूरवीरांनी देशासाठी दिलेले योगदान त्यांनी विशद केले. भारतातील मूळनिवासी संस्कृती टिकवण्याचे आणि जपण्याचे कार्य आदिवासी समाजाने महत्त्वपूर्णरीत्या पार पाडले असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यापीठातील ललित कला आणि प्रयोगजीवी संकुलातील लखन कनाके आणि त्यांच्या सहकलावंत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आदिवासी नृत्यामुळे आदिवासी संस्कृतीचे आर्तदर्शन घडले.

# नगर तालुक्यात युवकाचा शेततळ्यात बुडून

- मुलीचा गळफास घेऊन मृत्यू

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर तालुक्यातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या वेदनादायक घटनांमध्ये एका युवकाचा शेततळ्यात बुडून तर एका अल्पवयीन मुलीने (वय- १७) गळफास घेतल्याने मृत्यू झाला. या संबंधित घटनांप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाणे व अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. नांदगाव (ता. अहिल्यानगर) येथील कोळपे आखाडा परिसरात रविवारी (१६ नोव्हेंबर) सकाळी शिरोमणी अनिल जाधव (वय २३) हा युवक शिंदे यांचे शेततळ्यात पडल्याने गंभीर अवस्थेत होता. त्याला तातडीने नातेवाईक किसन जाधव यांनी जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचारासाठी आणले. मात्र औषधोपचारापूर्वीच दुपारी २ वाजता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्पर्धा महत्त्वाची

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षणविद्यापीठ लोणेरे,समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे मुंबई विभागीय आविष्कार स्पर्धेचे आयोजन नुकतेच शैक्षणिक संकुल बेल्हे येथे करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन,बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी फार्मसी आणि इंजीनियरिंग शाखेचे १३५ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते.प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ,लोणेरे चे डीन डॉ.विशाल पांडे,विद्यापीठ आविष्कार समन्वयक डॉ.संजय खोब्रागडे उपस्थित होते. तसेच आविष्कार २०२५ च्या कार्यक्रमासाठी विशेषतःनारायणगाव,मंचर,बोटा,कर्जुले हर्या,संगमनेर, इंदापूर आणि पुण्यातील विविध महाविद्यालयातील प्राचार्य उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना माजी जिल्हा परिषद सदस्य स्नेहल शेळके म्हणाल्या की विद्यार्थी हा स्पर्धेतूनच घडत असतो.स्पर्धा ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची असून जास्तीत जास्त स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा. विषयानुसार विजेते विद्यार्थी हे १) मानव्यशास्त्र,भाषा आणि ललित कला:२) वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा:पदवीधर: ३) शुद्ध विज्ञान-पदवीधर ४) कृषी आणि पशुसंवर्धन:पदव्युत्तर ५) अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान पदव्युत्तर:६) औषध आणि फार्मसी पदव्युत्तर: यानुसार प्रथम द्वितीय आणि तृतीय असे विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून-डॉ. श्रीकांत स्वामी,डॉ. धनेश पडवळ,डॉ. उर्मिला सुखदेवे,डॉ.अनिता सावळे, डॉ. संजय खोब्रागडे,डॉ. प्रतिमा पडघन,डॉ.संगिता मेटकर,डॉ.दीपाली धिवरे,डॉ.पवन पाईकराव,डॉ. धनश्री बिरादार,डॉ. धैर्यशील घाडगे,डॉ.शैलजा जाधव, डॉ.मनोज गाढवे यांनी काम पाहिले.विजेत्या विद्यार्थ्यां चा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. विभाग प्रमुख डॉ.सचिन दातखिळे,प्रा.नितीन महाले, आविष्कार समन्वयक डॉ.मंगेश होले,डॉ.शितल गायकवाड,प्रा. शुभम गडगे,प्रा.प्राजक्ता शिंगोटे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रा.डॉ.सचिन भालेकर, प्रा.डॉ.राहुल लोखंडे, प्रा.डॉ.विजयकुमार वाकळे, प्रा. सागर तांबे, प्रा.श्रद्धा खळदकर, प्रा. काजल वाळुंज,समर्थ कॉलेज ऑफ इंजीनियरिंग प्रा.निर्मल कोठारी आणि प्रा. प्रियांका लोखंडे यांनी तसेच समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी आणि समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी आयोजन केले सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष वसंत शेळके,उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्य स्नेहल शेळके,कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत,समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.कुलदीप रामटेके,समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ. संतोष घुले,समर्थ कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड मॅनेजमेंटचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे,प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदिप गाडेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# अमानुष अत्याचार प्रकरणाने कळवणमध्ये पडसाद

- निर्दयी नराधमाला तात्काळ गोळ्या घालून ठार करा
- संतप्त नागरिकांची पोलिस ठाण्यात गरजणारी मागणी

**नाशिक कळवण :** (समर्थ गांवकरी)



मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात चार वर्षीय निष्पाप चिमुरडीवर झालेल्या पाशवी अत्याचारानंतर केलेल्या निर्घृण खुनाने संपूर्ण परिसर संतापाने जळत आहे. या अमानुष कृत्याचा निषेध करत कळवण तालुक्याच्या वतीने आज तहसीलदार व कळवण पोलीस ठाणे येथे संतप्त नागरिकांनी धडक देत जबरदस्त घोषणाबाजी केली. निर्दयी नराधमाला "तात्काळ गोळ्या घालून ठार करा!" या प्रखर मागणीचे निवेदन कळवणचे पोलीस निरीक्षक श्री. खगेंद्र टेंभेंकर यांना देण्यात आले. यावेळी नागरिकांचा आक्रोश, महिलांचा संताप आणि तरुणांचा रोष वातावरणाला अक्षरशः हादरवून सोडत होता.या जघन्य कृत्याची निंदा करत नागरिकांनी पोलिस प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करून आरोपीला उशिरा न लावता कठोर शिक्षेस सामोरे जावे, अशी मागणी केली. "अशी नराधमता समाजात सहनच होणार नाही, न्याय झालाच पाहिजे!" असा ठाम आवाज सभोवताली घुमत होता.या निषेध मोर्च्यात

विलास रौंदळ, प्रदीप पगार, संदीप शिंदे, शशी हिरे, शीतलकुमार अहिरे,

बालासाहेब शेवाळे, वसंत रौंदळ, बापू जगताप, सुरेश पगार, महेंद्र पगार,

प्रमोद निकम, मुन्ना काकुळते, गोरख देवरे, अनिल रौंदळ,

रवि पगार, सूरज पगार, काशिनाथ गुंजाळ, नानू पाडवी, किशोर चौरे

यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.संपूर्ण कळवण तालुका आज या घटनेने संतप्त आहे.न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच राहणार, असा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला.



अकोले : क्रीडा युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा परिषद , पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय ज्युदो क्रीडा स्पर्धा २०२५ - २६ नुकत्याच श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथे संपन्न झाल्या. या राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेत अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे , अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय , अकोले या महाविद्यालयाचा १२ वी कला शाखेतील विद्यार्थी कु.प्रणव रमेश पुंडे याने १९ वर्षे ज्युदो ९० किलो खालील वजन गटात कांस्यपदक पटकावले या गुणवंत खेळाडूला क्रीडा शिक्षक प्रा.योगेश उगले व पै. मोहन बोऱ्हाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

## थोडक्यात बातम्या...



### फूड मदर ममताबाईंनी पिकवला पाच फुटांचा दुधी भोपळा

राजूर (स. गांवकरी) : निसर्ग सेवेतून अपेक्षित ध्येय साध्य करता येते हे देवगावच्या सुप्रसिद्ध असलेल्या फूड मदर ममताबाई भांगरे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. सध्या त्यांच्या शेतात बियाण्यासाठी तयार करण्यात आलेल्या दुधी भोपळ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. दरवर्षीप्रमाणे त्यांनी यंदाही आपल्या शेतामध्ये विविध परसबागेच्या पिकांची लागवड करून त्यांचे बियाणे पुढील हंगामासाठी निर्माण करण्यासाठी जोरदार कंबर कसली आहे. त्यांनी यंदाच्या खरीप हंगामामध्ये लागवड केलेल्या गावरान दुधी भोपळ्याना सध्या मोठ्या प्रमाणावर फळे लगडली आहेत. त्यांच्या स्वतःच्या उंचीपेक्षाही अधिक उंच असलेल्या या दुधी भोपळ्यांची सर्वत्र चर्चा होत आहे. कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी , प्राध्यापक तसेच कृषी शास्त्रज्ञ आणि अभ्यासात यांची आपसुकच पावले ममता बाईंच्या शेताकडे देवगाव येथे वळत आहेत. आतापर्यंत शेकडो विद्यार्थी आणि शेतकरी तसेच अभ्यासक यांनी त्यांच्या शेतीला भेट दिली आहे. गावरान बियाण्यांचे निर्मितीसाठी व सेंद्रिय शेतीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी ममताबाई भांगरे यांनी गेली दोन दशके महत्त्वपूर्ण योगदान बायफ या आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त संस्थेच्या मार्गदर्शनाने दिलेले आहे. त्यांच्या शेतामध्ये सुमारे पाच फूट लांबीचा दुधी भोपळा सर्वांचे आकर्षण करत आहे. प्रत्येक फळांमध्ये साधारणतः अर्धा किलो गावरान अस्सल बियाणे तयार होते. पुढे ही बियाणे व्यवस्थित याच भोपळ्यांमध्ये टिकून ठेवले जाते. पुढील हंगाम सुरू होण्यापूर्वी हे भोपळे फोडून त्यातील बियाणे अलगत वेगळे केले जाते आणि मागणीनुसार त्यांचा पुरवठा केला जातो. अत्यंत चवदार आणि रुचकर असणाऱ्या या दुधी भोपळ्याच्या बियाण्यांना प्रचंड मागणी आहे. देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध प्रदर्शनांमध्ये ममता बाईंच्या या भोपळ्याची चर्चा सर्वत्र होताना दिसत आहे. निसर्गाशी अत्यंत एकरूप आणि एकसंध असलेल्या ममताबाई यांनी सेंद्रिय शेतीतून आपण व्यवस्थित उत्पन्न घेऊ शकतो हे आतापर्यंत अनेकदा सिद्ध केले आहे. त्यांचा गांडूळ खतापासून बनवलेल्या बीज गोळ्यांचा प्रयोग देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्वत्र नावाजला गेलेला आहे.



### धर्मसेवक डॉ. सोन्या पाटील यांच्या समाजसेवेच्या कार्याला नवा वेग

भिवंडी (स. गांवकरी) : समाज कल्याण न्यास महाराष्ट्र राज्य या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व धर्मसेवक डॉ. श्री. सोन्या काशिनाथ पाटील यांच्या प्रेरणेने गेल्या २३ वर्षांपासून ठाणे व पालघर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आदिवासी तसेच वंचित घटकांमध्ये विविध सामाजिक, आरोग्य व शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत. यात आदिवासी महिलांना साडी-मिठाई वाटप, मुलांसाठी शैक्षणिक साहित्य वितरण, आरोग्य तपासणी शिबिरे, स्वयंरोजगार प्रशिक्षण, नेत्र चिकित्सा शिबिरे, रक्तदान शिबिरे, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा महोत्सव अशा अनेक उपक्रमांचा समावेश आहे. आजच्या जगात माणुसकी हरवत चालली असताना ती जपण्याची गरज अधिक भासते. "इतरांच्या आनंदात आपला आनंद शोधणे व तळागाळातील लोकांच्या समस्या जाणून त्यांचे निरसन करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे हेच खरे समाजसेवा तत्त्व आहे," असे मार्गदर्शन प्रदेश कार्यकारिणी सदस्य व दैनिक स्वराज्य तोरण चे संपादक डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील यांनी केले. ते श्री वरदान मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, नारपोली, भिवंडी येथे आयोजित महिला आघाडी पद नियुक्ती सोहळ्या प्रसंगी बोलत होते. या वेळी जिल्हाध्यक्षा सौ. नलिनी चौधरी म्हणाल्या, "महिला आघाडीतील प्रत्येक महिला पदाधिकाऱ्यांनी निस्वार्थ भावनेने 'दादा' म्हणजेच संस्थापक डॉ. सोन्या पाटील यांच्यासोबत काम करणे गरजेचे आहे. संस्थेचा कोणताही कार्यक्रम असो, त्यात महिलांनी सक्रिय सहभाग देऊन समाजसेवेची साखळी अधिक मजबूत करावी."

### राज्यस्तरीय वधू-वर मेळावा व विशेष पुरस्कार वितरण समारंभ

नारायणगाव (स. गांवकरी) : महात्मा फुले विचार मंचच्या वतीने नारायणगाव येथे रविवार (दि. १६)रोजी कलासागर मंगल कार्यालय याठिकाणी राज्यस्तरीय सर्व जातीय वधू-वर मेळावा आणि विशेष पुरस्कार वितरण समारंभ आयोजित करण्यात आला . या कार्यक्रमाचा उद्देश तरुणाईला महात्मा फुल्यांच्या विचारांची ओळख करून देणे आणि सामाजिक समरसता वाढवणे हा होता.या मेळाव्यात विविध जिल्ह्यांतील वधू-वर जोडप्यांनी सहभाग घेतला. विशेष पुरस्कार वितरण समारंभात समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला.

# देशी - विदेशी दारूसह २ लक्ष ३६ हजाराचा मुद्देमाल जप्त!

**कंधार पोलिसांची धाडसी कार्यवाही**

**कंधार तालुक्यातील अंबुलगा शिवारातील घटना**

**कंधार :** (समर्थ गांवकरी)

कंधारच्या उपविभागीय पोलिस अधिकारी अश्विनी जगताप यांनी अवैधरित्या चालणाऱ्या धंद्यांना चांगलाच लगाम लावला असून, अवैधरित्या चालविण्यात येणाऱ्या व्यवसायिकांनाही चांगलाच चाप दिला आहे. याचाच एक भाग म्हणजे काल दिनांक १५ नोव्हेंबर रोज शनिवारी तालुक्यातील अंबुलगा शिवारातील बोरीफाटा ते कळका जाणाऱ्या रोडवरुन देशी - विदेशी दारू अवैधरित्या विक्रीसाठी घेऊन जात असल्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलीस उपनिरीक्षक अप्पासाहेब सानप यांच्या पथकाने सदरची दारू पकडून तब्बल २ लक्ष ३६ हजार २४० रुपयाचा मुद्देमाल जप्त करून, दोघा आरोपीवर पुन्हा दाखल करून, धाडसी कार्यवाही केली असल्याची माहिती पोलीस विभागाकडून प्राप्त झाली आहे.

घटनेचे सविस्तर वृत्त असे दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोज शनिवारी सकाळी १०:३५ चे सुमारास एक पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायर कार क्रमांक एम एस २६ एन ६२४१ च्या वाहनातून अवैधरित्या विक्रीसाठी देशी - विदेशी दारू घेऊन जात असल्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलीस उपनिरीक्षक



आप्पासाहेब सानप बीट जमादार बालाजी गारोळे यांनी सदर क्रमांकाच्या वाहनाचा पाठलाग करून तपासणी केली असता, सदरच्या वाहनात तपासाअंती १८० मिलीच्या १२० बॉटल त्यावर देशी दारू भिंगरी संत्रा असे कागदी लेबल असलेल्या प्रति बॉटल विक्री किंमत ८० रुपये याप्रमाणे ९६०० व १८० मिलिलीटर क्षमतेच्या १७ बॉटल्स त्यावर मॅकडॉल नंबर - १ असे कागदी लेबल असलेल्या प्रति बॉटल विक्री किंमत २२० रुपये प्रमाणे ३७४० रुपये. त्याचबरोबर ५०० रुपये दराच्या २५ नोटा, १०० रुपये दराच्या ७१ नोटा, २०० रुपये दराची १ नोट, ५० रुपये दराच्या ५८ नोटा, २० रुपये दराच्या १० नोटा अशा एकूण नोटांची किंमत २२ हजार ९०० रुपये व २ लक्ष रुपये किमतीची शिफ्ट डिजायर कार असा एकूण २ लक्ष ३६ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांच्या आदेशान्वये पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब सानप यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कंधार पोलीस ठाण्यात आरोपी जलील घुडूसाब शेख वय ३५ वर्षे राहणार बहादरपुरा व श्याम रामास्वामी गौड राहणार कंधार या दोघा विरुद्ध देशी - विदेशी दारू अवैध मार्गाने विक्री करणे, व स्वतःजवळ बाळगणे या कलमाखाली गुन्हा दाखल करून, पुढील तपास बीट जमादार बालाजी गारोळे यांच्याकडे दिला आहे.

## शहरात रेन वॉटर हार्वेस्टिंग अनिवार्य

**नाशिक :** (समर्थ गांवकरी)

महानगरपालिकेच्या वतीने आज गोदावरी नदी प्रदूषणमुक्तीसंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत गोदावरीचे प्रदूषण कमी करण्यासाठी विविध उपाययोजना तसेच तातडीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत नद्या आणि नाल्यांना जोडणाऱ्या गटारींचे पाणी गोदावरीमध्ये मिसळू नये यासाठी योग्य नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. त्याचबरोबर शहरातील अन्य नाल्यांचे अचूक व्यवस्थापन करून गोदावरी नदी प्रदूषित होणार नाही यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याबाबतही चर्चा झाली. रेन वॉटर हार्वेस्टिंगबाबतही विशेष चर्चा करण्यात आली. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम अनिवार्य असल्याने, येत्या पंधरा दिवसांत नगररचना विभागामार्फत सर्व शासकीय कार्यालयांना भेट देऊन कार्यवाहीची पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

तसेच शहरातील क्रेडाई मेट्रो बांधकाम व्यावसायिक संस्था यांनी यापूर्वी उभारलेल्या इमारतींना रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम कार्यान्वित करणे बंधनकारक असल्याचे सूचित करण्यास सांगितले. नदीकाठावरील फेरीवाल्यांकडून केरकचरा नदीपात्रात टाकल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

## जागतिक वारसा सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रम

**सांस्कृतिक ठेव्यांच्या संरक्षणासाठी जनजागृती**

**नाशिक :** (समर्थ गांवकरी)

जागतिक वारसा सप्ताहानिमित्त १९ ते २५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत विविध कार्यक्रम होणार आहेत. राज्य पुरातत्व विभागाचे सहायक संचालक अमोल गोटे यांनी ही माहिती दिली आहे. देशात १९ ते २५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत जागतिक वारसा सप्ताह (World Heritage Week) राबविण्यात येणार आहे. देशाच्या समृद्ध सांस्कृतिक, ऐतिहासिक व नैसर्गिक वारशाबद्दल नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या सप्ताहाचा उद्देश आहे. नाशिक येथे राज्य पुरातत्व विभाग नासिक व इंटक नाशिक चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक, त्रिंबक आणि साल्हेर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आहे आहे. साल्हेर किल्लाचा समावेश जागतिक वारसा म्हणून नोंद झाली आहे. त्यामुळे यावर्षी नाशिककरांसाठी विशेष पर्वणी आहे. यानिमित्त नाशिक येथे हेरिटेज वॉक, बंगाली संगीताचा कार्यक्रम, गंगाआरती, साल्हेर किल्ला येथे दुर्ग भ्रमण, मैदानी खेळांचे प्रात्यक्षिक, शस्त्रास्त्र प्रदर्शन, त्रिंबक येथे हेरिटेज वॉक, गंगारतीचा कार्यक्रम होणार आहे. जागतिक वारसा सप्ताहात नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. तसेच या सप्ताहानिमित्त श्री व्यंकटेश बालाजी संस्थान ट्रस्ट, इंटेक नाशिक चॅप्टर आणि पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, नाशिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बाऊल संगीत सादरीकरण होईल. मधुसूदन बाऊल, सनातन बाऊल (पश्चिम बंगाल) हे सादरीकरण करतील. बुधवार १९ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी सहा वाजता श्री व्यंकटेश बालाजी मंदिर, कापड पेठ, नाशिक येथे हा कार्यक्रम होणार असून तो सर्वांसाठी खुला आहे. तसेच सायंकाळी साडेसात वाजता बालाजी मंदिर ते बालाजी कोट, मुरलीधर मंदिर ते गोरा राम मंदिर मार्गे हेरिटेज वॉक होईल. रात्री नऊ वाजता नारोशंकर मंदिराजवळ समारोप होईल. २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता सीता गुंफा ते रामकुंड हेरिटेज वॉक, २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री ८ या कालावधीत सार्वजनिक वाचनालय, नाशिक येथे हेरिटेज वॉक, २२ नोव्हेंबर रोजी साल्हेर किल्ला दुर्गभ्रमण, २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता कमलवाडा (पंचवटी परिसर) संग्रहालयास भेट, २४ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेसात वाजता अंजनेरी येथे भेट देण्यात येईल. समारोपाच्या दिवशी दुपारी ४ ते रात्री ८ या वेळेत त्र्यंबकेश्वर येथे समागम तीर्थ ते गंगासागर तलावापर्यंत हेरिटेज वॉक होईल.

## निधीचे विहित कालावधीत खर्चाचे नियोजन करावे



- जिल्हाधिकारी आयुष प्रसाद
- जिल्हा नियोजन समितीच्या विविध कामांचा आढावा

**नाशिक :** (समर्थ गांवकरी)

जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून होणारी विविध विकास कामे वेळेत पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी. 2026 - 2027 च्या प्रारूप आराखड्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव आयुष प्रसाद यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आज दुपारी जिल्हा नियोजन समितीची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे, समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त देविदास नांदगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी दत्ता आव्हाड यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. प्रसाद म्हणाले की, जिल्ह्याला 900 कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर असून 451 कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. आतापर्यंत 169 कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित विभागांनी निधी वेळेत खर्च होऊन कामे पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी. प्रगतीपथावरील कामांना गती द्यावी. तसेच दायित्वाच्या निधीबाबत तत्काळ जिल्हा नियोजन समितीकडे माहिती सादर करावी. आरोग्य विभागाने आचारसंहिता लागू होण्यापूर्वी औषधांची खरेदी प्रक्रिया पूर्ण करावी. निविदा प्रक्रिया पारदर्शी पद्धतीने पूर्ण करावी. विभागांनी प्रस्ताव सादर करताना आयपास या संगणकीय प्रणालीचा वापर करावा. तसेच एमपीएसआयएमएस या प्रणालीवर नोंदणी करून ओळख क्रमांक प्राप्त करून घ्यावा.

## कळवण नरूळ आठवडी बाजार आता मंगळवारी होणा सुरू

**कळवण :** (समर्थ गांवकरी)

कळवण तालुक्यातील नरूळ गावात मंगळवारी सायंकाळी 4 वाजता सुरू होणाऱ्या आठवडी बाजाराला गावभरात उत्साहाची लाट उसळली आहे. गावातील ज्येष्ठ–श्रेष्ठ व्यक्तींसोबतच तरुणांनी एकत्र येत घेतलेल्या निर्णयामुळे या बाजाराची पुनर्सुरुवात होत असून, याचा थेट फायदा नरूळसह आजूबाजूच्या अनेक दुर्गम वस्ती-वाड्यांतील नागरिकांना होणार आहे.गेल्या काही महिन्यांपासून स्थानिकांना भाजीपाला, धान्य, किराणा यांसह दैनंदिन गरजांच्या वस्तूंसाठी दूरवरची पायपीट करावी लागत होती. अनेक वेळा नागरिकांना अडचणींचा सामना करत "बाजार कधी भरतोय?" असा प्रश्न पडत असे. त्या पार्श्वभूमीवर हा निर्णय म्हणजे नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे.नरूळचा हा आठवडी बाजार केवळ ठेलागाड्यांचा किंवा विक्रेत्यांचा बाजार नसून, गावातील अर्थचक्राला वेग देणारा आणि छोट्या व्यापाऱ्यांसाठी जीवनरेखा ठरणारा आहे.

# प्रेडर–विली सिंड्रोम असलेल्या ११ वर्षांच्या ९५ किलो वजनाच्या मुलावर अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी लेप्रोस्कोपिक स्लीव्ह गॅस्ट्रेक्टमी

**नाशिक :** (समर्थ गांवकरी)

प्रेडर–विली सिंड्रोम (Prader–Willi Syndrome) या दुर्मिळ जनुकीय विकारामुळे असह्य भूक, सतत खाणे आणि झपाट्याने वाढणारे वजन यामुळे त्रस्त असलेल्या ११ वर्षांच्या ९५ किलो वजनाच्या मुलावर अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे वरिष्ठ बॅरियाट्रिक सर्जन डॉ. संदीप सबनीस यांनी लेप्रोस्कोपिक स्लीव्ह गॅस्ट्रेक्टमी शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली.





या मुलाला अतिवजनामुळे झोपेत श्वासोच्छ्वासाचा त्रास (स्लीप ॲप्निया), हालचालींमध्ये अडचण, तसेच भविष्यात डायबेटिस आणि हायपरटेन्शनचा गंभीर धोका निर्माण झाला होता. पारंपरिक आहार-नियंत्रण पद्धतींनी परिणाम दिसत नसल्याने तज्ज्ञांच्या बहुवैद्यकीय समितीने शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला.

सखोल मूल्यमापनानंतर ही शस्त्रक्रिया डॉ. संदीप सबनीस व पेडियाट्रिक एंडोक्रायनोलॉजिस्ट डॉ. तुषार गोडबोले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. मुख्य ॲनेस्थेशिया डॉ. संदीप भंगाळे आणि सर्जन डॉ. प्रखर गुप्ता यांनीही या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली.

ही शस्त्रक्रिया अतिशय लहान चिरांद्वारे लेप्रोस्कोपिक पद्धतीने करण्यात आली असून मुलाची प्रकृती सध्या उत्तम आहे. तो एक–दोन दिवसांत घरी जाण्याच्या स्थितीत आहे.

डॉ. संदीप सबनीस म्हणाले, "प्रेडर–विली सिंड्रोममध्ये मुलांची भूक नियंत्रणात ठेवणे जवळजवळ अशक्य होते. त्यामुळे अल्पवयातच अतिलठ्ठपणा जीवघेणा होऊ शकतो. अशा निवडक रुग्णांमध्ये स्लीव्ह गॅस्ट्रेक्टमी हा सुरक्षित आणि जीवनरक्षक पर्याय ठरतो."

याप्रसंगी डॉ. तुषार गोडबोले, डॉ. प्रखर गुप्ता, डॉ. संदीप भंगाळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या यशस्वी शस्त्रक्रियेने अशोका मेडिकव्हर रुग्णालयाने प्रगत बॅरियाट्रिक व मेटाबॉलिक केअरमध्ये आपले नेतृत्व अधिक दृढ केले आहे. विशेषत: प्रेडर–विलीसारख्या गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये अत्याधुनिक उपचार देण्याची क्षमता नाशिकमध्ये उपलब्ध असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

अशोका मेडिकोव्हर हॉस्पिटलचे मार्केटिंग प्रमुख श्री. शिवकुमार रोहाडे यावेळी उपस्थित होते.

# ठाणे येथे नशामुक्त भारत अभियानाची शपथ

## अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या नशामुक्त भारत अभियान (NMBA) च्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त देशभरात विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्यानुसार जिल्हा परिषद, ठाणे मुख्यालयात आज, दि. १८ नोव्हेंबर, २०२५ रोजी अधिकारी–कर्मचाऱ्यांकडून "नशामुक्ती शपथ" घेतली गेली.

जिल्हा परिषदेतील शपथ विधी कार्यक्रमास उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, समाज कल्याण विभाग प्रमुख तसेच कार्यक्रमाचे जिल्हा नोडल अधिकारी उज्वला सपकाळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बाल कल्याण विभाग संजय बागुल, कार्यकारी अभियंता (समग्र शिक्षा) युवराज कदम तसेच जिल्हा परिषदेतील विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी व्यसनापासून दूर राहण्याची शपथ घेत, व्यसनमुक्त व निरोगी समाज घडविण्याचा संकल्प व्यक्त केला.

"मी शपथ घेतो/घेते की, मी कोणत्याही प्रकारचे व्यसन किवा नशा करणारे पदार्थ सेवन करणार नाही. मादक पदार्थांच्या दुष्परिणामांबद्दल जनजागृती करीन आणि इतरांना नशेपासून दूर राहण्यासाठी प्रेरित करीन. व्यसनमुक्त, निरोगी समाज घडवण्यासाठी मी कटिबद्ध आहे. एकत्र येऊन आपण नशामुक्त भारत घडवू." ही सामुहिक शपथ घेण्यात आली. जिल्हा प्रशासनाने अधिकाधिक नागरिकांनी या अभियानात सहभागी होऊन व्यसनमुक्त जिल्हा घडविण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन केले आहे.





ठाणे, दिवा : NHSRCL, नवी दिल्ली द्वारे CSR सहाय्य निधी अंतर्गत भक्तिवेदांत रुग्णालय आणि संशोधन संस्था यांच्या सहयोगाने आगासन येथील श्री गणेश मुंडे यांच्या शिवसेना जनसंपर्क कार्यालयात मोफत आरोग्य शिबीर राबविण्यात आले. सदर शिबिरात रक्तदाब (BP), शुगरसाठी मोफत औषधे, मोफत मेमोग्राफी (स्तनाची तपासणी), मोफत डोळ्यांची तपासणी व चष्मा वाटप, ECG आदी करण्यात आले प्रसंगी शेकडो नागरिकांनी आपला सहभाग नोंदवला. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### अमोल वाघमारे व योगेश कापसे यांचा सत्कार, दिवाळी अंक व घड्याळ भेट!

अकोले (स. गांवकरी) : सहकारी संस्था विभागाचे सहाय्यक निबंधक अमोल वाघमारे व मुख्य लिपिक योगेश कापसे यांचा दैनिक समर्थ गांवकरी परिवारातर्फे सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. दैनिक समर्थ गांवकरीचे कार्यालयीन व्यवस्थापक अमोल पुंडे यांच्या हस्ते मान्यवरांना दैनिक समर्थ गांवकरीचा दिवाळी अंक तसेच घड्याळ भेट देऊन गौरव करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी वाघमारे व कापसे यांच्या कार्याचा गौरव करत सहकारी क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचे कौतुक केले. यावेळी समर्थ गांवकरी परिवारातील प्रतिनिधींची उपस्थिती लाभली.

### जुन्नर नगरपरिषद नगराध्यक्ष पदासाठी ८ व नगरसेवक पदासाठी ६१ अर्ज दाखल

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर नगरपरिषद नगराध्यक्ष पदासाठी ८ व नगरसेवक साठी ६१ अर्ज दाखल झाले आहेत . नगराध्यक्ष पदासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना या गटाने २ , अपक्ष ४ , भारतीय जनता पार्टी १ व काँग्रेस आय पक्ष १असे अर्ज दाखल झाले आहेत . अशी माहिती जुन्नर निवडणूक निर्णय अधिकारी अमोल कदम व निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी चरण कोल्हे यांनी माहिती सांगितली आहे. नगरसेवक पदासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाकडून ५ , आम आदमी पार्टी १ , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट ११ , अपक्ष २४ , काँग्रेस आय पक्ष ६ , शिवसेना १० , भारतीय जनता पार्टी ४असे एकूण ६१ अर्ज दाखल झाले आहेत . अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अमोल कदम व चरण कोल्हे यांनी सांगितले आहे.

### साई आदर्श मल्टीस्टेटकडून छ. शिवाजी प्राथमिक विद्यालयाला डिजिटल बोर्ड भेट

राहुरी (स. गांवकरी) : राहुरी फॅक्टरी येथील साई आदर्श मल्टीस्टेट संस्थेने सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून एक प्रशंसनीय उपक्रम राबवत छत्रपती शिवाजी प्राथमिक विद्यालयास अत्याधुनिक चार डिजिटल बोर्ड भेट दिले.आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून विद्यार्थ्यांचे ज्ञान अधिक परिणामकारक पद्धतीने वाढावे, शिक्षण अधिक आकर्षक आणि समजण्यास सोपे व्हावे, यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला आहे. यावेळी बोलताना साई आदर्श मल्टिस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे म्हणाले आजच्या डिजिटल युगात मुलांना पारंपरिक शिक्षणाबरोबरच स्मार्ट शिक्षणाची साथ मिळणे अत्यंत आवश्यक झाले आहे.याच गरजेला प्रतिसाद देत साई आदर्श मल्टीस्टेटने ही महत्त्वाची सुविधा उपलब्ध केली असून डिजिटल बोर्डच्या माध्यमातून शिक्षकांना विषयांचे सादरीकरण सुलभ होणार आहे. यावेळी श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कोळसे, डॉ.तनपुरे कारखान्याचे संचालक अशोक उऱ्हे, विष्णुपंत गीते, किशोर थोरात, शांती चौक मित्र मंडळाचे अध्यक्ष दीपक त्रिभुवन, दत्तात्रय गोपाळे, मॅनेजर सचिन खडके, योगेश आंबेडकर सर, सुजित गवळी, मुख्याध्यापीका चोखर मॅडम आदींसह शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी ज्ञानदेव कोळसे म्हणाले साई आदर्श नेहमीच सामाजिक कामात अग्रेसर राहिली आहे. अर्थ कारना बरोबर शिवाजीराव कपाळे यांचे सामाजिक काम वाखाण्याजोगे व इतरांनी त्यांचा आदर्श घेण्या जोगे आहे. या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका चोखर मॅडम यांनी साई आदर्श मल्टीस्टेटचे आभार व्यक्त करत संस्था सातत्याने शैक्षणिक क्षेत्रात योगदान देत असल्याचे सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देशमुख सर यांनी केले.

### दिव्यातील महिला बचत गटाला मा. शैलेश पाटील यांचा मदतीचा हात



ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरातील महिला बचत गटाला मदतीचा हात मिळाल्याने मोठं पाठबळ मिळाले आहे. दिवा शहरातील कार्यसम्राट मा. नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या वतीने आज श्री समर्थ चरण व सदगुरू कृपा महिला बचत गटाला स्वयंरोजगार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. भाकरी तयार करण्याच्या यंत्र तसेच इतर सामग्री देऊन सदर महिला बचत गटास पुढे ही लागेल ते सहकार्य करण्याचे आश्वासन श्री पाटील यांनी दिले आहे. महिलांच्या उदरनिर्वाहासाठी व महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी मा. नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांचा नेहमीच पुढाकार असतो असे त्यांचे निकटवर्तीय व विभाग प्रमुख भालचंद्र भगत यांनी बोलताना स्पष्ट केले आहे. बचत गटामुळे महिला सक्षम होत आहेतच, त्याच बरोबरीने अनेक महिलांच्या छोटया मोठ्या उद्योगाना पाठबळ मिळत आहे. दिवा पश्चिम या भागातील महिलांनी अनेक छोटे मोठ्या व्यवसायाना जोड दिली आहे. दोनशे पेक्षा अधिक महिलांना ऑटो रिक्षा आणि इतर महिलांना पाटील यांनी मदतरुपी सहकार्य केलआहे. तसेच दिवा विकास प्रतिष्ठानच्या वतीने महिलांना अनेक सरकारी योजनांचा लाभ मिळवून दिला जातो. दिवा शहरातील प्रत्येक सामाजिक उपक्रमांमध्ये बचतगटातील महिलांचा पुढाकार असतो असे बचत गटाच्या काही महिलांनी सांगितले असून श्री समर्थ चरण व सदगुरू कृपा महिला बचत गटाच्या सर्व महिलांनी श्री पाटील यांचे अभिनंदन करून आभार मानले आहे.

# ढोकरी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माजी विद्यार्थी संघाची स्थापना!

**ढोकरी : (समर्थ गांवकरी)**



राज्य सरकारच्या "ज्यांना शाळेने घडवलं तेच शाळेला घडवणार" या महत्त्वाकांक्षी उपक्रमाखाली राज्यातील सर्व शाळांमध्ये माजी विद्यार्थी संघ बंधनकारक करण्यात आला आहे. या उपक्रमाची तात्काळ अंमलबजावणी करत ढोकरी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माजी विद्यार्थी संघाची स्थापना मोठ्या उत्साहात करण्यात आली. शाळेच्या भौतिक विकासात व गुणवत्ता वृद्धीसाठी माजी विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा या हेतूने सरकारने मिशन आपुलकीच्या माध्यमातून हा उपक्रम हाती घेतला असून ढोकरी शाळेने यात म्हणावा असा पुढाकार घेतला आहे.

माजी विद्यार्थी संघाची स्थापना: सेवानिवृत्त प्राचार्य श्री. शांताराम प्रभू पुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली संघ स्थापनेची प्रक्रिया पार पडली. ध्येय, उद्दिष्टे व संघाचे कार्यक्षेत्र याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

अध्यक्षपदी : श्री. शांताराम प्रभू पुंडे (सेवानिवृत्त प्राचार्य)

उपाध्यक्षपदी : श्री. अशोक जयराम शेटे

सचिव : श्री. भास्कर कारभारी भाईक (मुख्याध्यापक)

तब्बल ५० माजी विद्यार्थी सदस्यपदी नामनिर्देशित झाले.

शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. दत्तात्रय संपत शेटे यांनी संघाचा उद्देश व कार्यपध्दती याची सविस्तर माहिती दिली.

'मिशन आपुलकी' अंतर्गत उदंड प्रतिसाद – शाळेला उदार भेटवस्तू!

विविध माजी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांनी शाळेला साहित्य भेट देऊन उपक्रमाला मोठा हातभार लावला.

श्री. शांताराम प्रभू पुंडे – ७५०० रुपयांचे ढोल व लेझीम साहित्य

श्री. रमेश विलास गोपाळे (मेजर, CISF) – १२,००० रुपयांचे वॉटर फिल्टर मशीन

श्री. दत्तात्रय संपत शेटे – सर्व विद्यार्थ्यांसाठी ३,००० रुपयांची आयडेंटी कार्डे

श्री. रवींद्र गेनू पुंडे – २५,000 रुपयांचा प्रिंटर व १०,000 रुपयांचे कपाट

श्री. कैलास पुंजा नवले – शाळेच्या कमानीसाठी 5001 रुपये

अधिवक्ता सौरभ गोविंद पुंडे व गोविंद पुंजा पुंडे – ३७५० रुपयांच्या पाच खुर्च्या

श्री. निलेश राघू यंधे – ३,००० रुपयांचा मिक्सर

श्री. मयूर तानाजी खतोडे (सत्यम फर्निचर) – ४,००० रुपयांचा इडली मेकर

या सर्व मान्यवरांचा सन्मान करून कार्यक्रमस्थळी आनंदाचा माहोल निर्माण झाला.

सर्व विद्यार्थ्यांना भोजनाचा आनंद: सर्व माजी विद्यार्थी व उपस्थितांनी शाळेतील सर्व मुलांना व माजी विद्यार्थ्यांना स्वादिष्ट भोजनाची मेजवानी दिली.

उपस्थित मान्यवर: या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी उपस्थित होते. त्यात प्रमुखपणे –

श्री. बाळासाहेब पानसरे, सौ. बीजलाबाई कदम, संकेत पुंजीराम पुंडे, संकेत जिजाबा पुंडे, सचिन गुंजाळ, दत्तात्रय सूर्यवंशी, दत्तात्रय पुंडे, रामदास वाघ, निलेश यंधे, विजय दौंड, अनिल कदम, रोहिदास पवार, जीवन मुठे, सौ. लक्ष्मी डोळस, मयूर पुंडे, साहेबराव घुले, प्रशांत शेटे, कारभारी शेटे, बबन शेटे, अशोक शेटे, दत्तात्रय शेटे, किसनराव शेटे, शांताराम पुंडे, संजय पाटोळे, निवृत्ती शेटे, सौ. संकेता पुंडे, सौ. सोनाली पुंडे तसेच इतर मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन श्री. भास्कर कारभारी भाईक यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. चौधरी फक्कड नामदेव यांनी केले. सर्व उपस्थितांनी दिलेल्या साहित्याबद्दल समाधान व्यक्त केले. भविष्यातही शाळेच्या विकासासाठी सातत्याने मदत व सहकार्य करण्याचे आश्वासन सर्व माजी विद्यार्थ्यांनी दिले.

# घुगलवडगावच्या स्वस्त धान्य दुकानाला नवी दिशा

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

- पहिल्या निवडलेल्या दुकानदाराकडे पुन्हा कामकाज

घुगलवडगाव येथील स्वस्त धान्य दुकानाचे कामकाज नव्या उत्साहात आणि नव्या व्यवस्थेसह पुन्हा सुरू करण्यात आले. काल दि. १६ नोव्हेंबर रोजी झालेल्या उद्घाटन सोहळ्यात गावकऱ्यांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली. विशेष म्हणजे, सुरुवातीला ज्यांची अधिकृत निवड करण्यात आली होती ते दुकानदार दत्तात्रय दांगडे यांच्याकडेच पुन्हा दुकानाची संपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली आहे. काही काळ दुकानाचे कामकाज विस्कळीत झाल्याने तक्रारी वाढल्या होत्या. धान्यवाटपात अनियमितता व गैरसोयी वाढत असल्याचे नागरिकांनी पुरवठा विभागाकडे वारंवार निदर्शनास आणून दिले होते. त्यानंतर विभागाने तपासणी करून पहिल्या अधिकृत दुकानदाराला पुन्हा नियुक्त करण्याचा निर्णय घेतला. उद्घाटन प्रसंगी स्वस्त धान्य दुकानदार जिल्हा अध्यक्ष सतिष अरुणकाका हिरडे पा. यांच्या उपस्थितीत पूजा करून दुकानाचे पुनरुज्जीवन करण्यात आले.

# 'हिमालया वेलनेस'ने सादर केले 'सीरम-इन्फ्यूज्ड बॉडी लोशन'

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**




भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह अशा पर्सनल केअर ब्रँड्सपैकी एक अशा 'हिमालया वेलनेस' ने भारतीय महिला आइस हॉकी संघासोबत भागीदारी करत आपला #StrongWomenSoftSkin हा नवीन उपक्रम सुरू केला आहे. कंपनीने हिमालया कोको बटर इंटेन्सिव्ह सीरम बॉडी लोशन बाजारात आणले आहे. सीरमचे फायदे आणि शंभर टक्के नैसर्गिक घटकांचे गुणधर्म यांचा संगम असणारे हे अशा प्रकारचे पहिलेच उत्पादन आहे. या लोशनमुळे त्वचेची खोलवर आणि दीर्घकाळ टिकणारी निगा राखली जाते. ज्या महिला आपले क्षितीज विस्तारून आव्हानांचा सामना धैर्याने आणि चिकाटीने करतात, त्यांचा सन्मान कंपनीने खेळाडूंशी केलेल्या भागीदारीच्या माध्यमातून होत आहे. या डिजिटल व्हिडिओमध्ये भारतीय महिला आइस हॉकी संघ झळकत आहे. व्हिडिओची सुरुवात लॉकर रूममध्ये होते. बर्फावर उतरण्याच्या आधी खेळाडू या लॉकर रूममध्ये हिमालया कोको बटर इंटेन्सिव्ह सीरम बॉडी लोशन वापरत असल्याचे यात दाखविण्यात आले आहे. या व्हिडिओमध्ये लोशनच्या सखोल पोषण देणाऱ्या आणि संरक्षणात्मक गुणांची तुलना खेळाडूंच्या ताकद, जिद्द आणि चिकाटीशी करण्यात आली आहे. हे लोशन अत्यंत थंड, हिवाळी परिस्थितीतही त्वचा मॉइश्चरायझ्ड आणि मऊ ठेवते, त्याचप्रमाणे खेळाडूही कठोर परिस्थितीत मजबूत राहतात. ज्या वातावरणात जिद्दीची खरी परीक्षा होते, त्या ठिकाणीही प्रभावी ठरणारे हे लोशन मॉइश्चरायझेशनचा सुवर्णमापदंड म्हणून समोर येते. वातावरणातील प्रत्येक आव्हानाच्या वेळी ते त्वचा मऊ आणि मॉइश्चरायझ्ड ठेवते. नैसर्गिक कोकोयुक्त सीरमने समृद्ध असलेले हे लोशन ४८ तास टिकणारे मॉइश्चरायझेशन देते, तसेच त्वचेला अनुकूल ठरणारे ५.५ पीएच हे संरक्षण देते. 'हिमालया वेलनेस'च्या कंझ्युमर प्रॉडक्ट्स विभागाचे बिझनेस डायरेक्टर राजेश कृष्णमूर्ती म्हणाले, "भारतीय महिला आइस हॉकी संघासोबतची भागीदारी आम्हाला ताकद आणि जिद्दीचा उत्सव साजरा करण्याची संधी देत आहे. ताकद आणि जिद्द ही दोन्ही मूल्ये 'हिमालया वेलनेस'च्या मूलभूत तत्त्वांपैकी आहेत.

# रेल्वे स्टेशन रस्त्याची तातडीने दुरुस्ती व्हावी - सुभाष शिंदे

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**




सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत येणारा मढेवडगांव ते म्हातारपिंप्री रेल्वे स्टेशन या रस्त्याची सध्या दुरावस्था झालेली आहे. श्रीगोंदा हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे म्हातारपिंप्री, मढेवडगांव, शिरसगांव बोडखा, बाबुर्डी, चिंभळा, येळपणे, पिसोरे, बोरी, म्हसे, माठ इत्यादी गावातील लोकांना दैनंदिन कामकाजासाठी श्रीगोंद्यास यावे लागते. परंतु मढेवडगांव ते म्हातारपिंप्री रेल्वे स्टेशन हा रस्ता अतिशय खराब झाल्यामुळे रहदारीस खुप त्रास होत आहे. रस्त्यांवरील खड्डे चुकविताना अनेक वाहनांचे अपघात होत आहेत, वाहनांचे नुकसान होत आहे त्याचप्रमाणे दुचाकीवरील प्रवाशांना मणक्याचा त्रास जाणवु लागलेला आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्ती व्हावी यासाठी नागवडे कारखान्याचे संचालक सुभाष शिंदे यांनी नायब तहसीलदार जाधव यांना निवेदन देऊन मागणी केली आहे. तसेच रेल्वे स्टेशनजवळील उड्डाण पुलाचे काम असुन ते अत्यंत संथ गतीने चालू आहे. तेथील रस्त्यावर लहान-मोठे खड्डे पडलेले आहेत.त्यामुळे वाहन चालवताना खुपच कसरत करावी लागत असल्याने अनेक वाहनांचे नुकसान झालेले आहे. दुचाकीवरील प्रवाशांचे अपघात होवून त्यांना दुखापती झालेल्या आहेत.

# निसारभाई चिंचोलीकर पुरस्काराने सन्मानित

**खोडद : (समर्थ गांवकरी)**

लोकशक्ती न्यूज नेटवर्कचा प्रथम वर्धापन दिन व महाराष्ट्र गौरव पुरस्कार वितरण सोहळा अहिल्यानगर येथील हॉटेल यश ग्रँड येथे संपन्न झाला. या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात ताशा वादन क्षेत्रात अद्वितीय कामगिरी, प्रचंड लोकप्रियता आणि अनेक वर्षांची सांस्कृतिक सेवा याबद्दल चिंचोली काशीद ता.जुन्नर येथील निसारभाई पटेल यांना ताशा सम्राट पुरस्काराने गौरविण्यात आले.

निसारभाई पटेल एकमेव जुन्नर तालुक्यातील ताशा परंपरेला दिशा देणारे आहेत. ताशा पथकांचे प्रशिक्षण, युवकांना कलेची गोडी निर्माण करणारे आहेत. सार्वजनिक उत्सव आणि सांस्कृतिक सोहळ्यांमध्ये त्यांच्या ताशापथकाचा नावलौकिक त्यांची ओळख 'ताशा सम्राट' म्हणून राज्यभर पसरली आहे. त्यांच्या ताशा वादनातील बारकावे आणि भव्य आविष्कार म्हणजे महोत्सवात उर्जा असते.

# ठाणे मनपा कार्यक्षेत्रात प्रदुषण नियंत्रणाबाबत उपाययोजनांचा आढावा

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



ठाणे शहरातील पर्यावरण संवर्धन, प्रदुषण नियंत्रण, एकल वापर प्लॅस्टिक वस्तू, याचबरोबर रहिवासी संकुलातील सांडपाण्याचा पुर्नवापर आदी बाबींसाठी ठाणे महापालिका प्रयत्नशील आहे. ठाणे हे स्वच्छ, हरित शहर आहेच परंतु ठाणे महापालिका राबवित असलेल्या उपक्रमांमध्ये प्रत्येक नागरिकांनी 100 टक्के सहभाग दिला तर पुढच्या पिढीला आणखीन पर्यावरणभिमुख असे ठाणे शहर अनुभवयाला मिळेल असे मत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिध्देश कदम यांनी आज ठाणे महापालिकेत व्यक्त केले. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिध्देश कदम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत रोडे, पर्यावरण विभागाच्या मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी घनकचरा व्यवस्थापन विभाग, मलनिस्सारण विभाग, प्रदुषण नियंत्रण विभाग, पशुवैद्यकीय विभाग राबवित असलेल्या उपक्रमाचे सादरीकरण प्रशासनाकडून करण्यात आले. ठाणे किंवा कोणत्याही शहरात होणारे प्रदुषण हे त्या शहरापुरतीच मर्यादित राहत नाही तर त्याचा परिणाम संपूर्ण राज्याला, देशाला होत असतो म्हणून प्रत्येकांनी आपापल्या घरातील प्रदुषण कसे नियंत्रणात राहील या संदर्भात प्रत्येक शहराने इतरांसोबत देवाणघेवाण करणे खूप गरजेचे आहे. शहरात बांधकाम चालू असलेल्या इमारतींमुळे प्रदुषण होवू नये यासाठी रेडी मिक्स प्लांटला आच्छादन करणे, रेडी मिक्स वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांचे टायर धुणे अशा विविध बाबी संदर्भात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने यापूर्वीच महापालिकेला निर्देश दिले असून त्याची अंमलबजावणी होत असून ती अधिक प्रभावीपणे होणे गरजेचे असल्याचे अध्यक्षांनी नमूद केले.

शहरात येणाऱ्या मोठ्या वाहनांचे टायर हे शहराच्या प्रवेशद्वारावरच धुतले गेले तर त्या टायरमधून शहरात होणारे धुळीचे प्रमाण कमी होईल व त्या माध्यमातून रस्त्यावरची धूळ नियंत्रणात येईल असेही त्यांनी नमूद केले.

तसेच नागरिक देखील जास्तीत जास्त प्रमाणात सार्वजनिक वाहनांचा वापर कसा करतील यासाठी ॲक्शन प्लॅन तयार करण्याच्या सूचना अध्यक्षांनी या बैठकीत दिल्या. नवीन मार्गदर्शक तत्पवे सर्व आरएमसी प्रकल्पाना ठामपाने वितरीत कराव्यात व त्याचे तंतोतंत पालन करण्याबाबत आदेश निर्गमित करण्याच्या सूचना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिध्देश कदम यांनी दिल्या.